## उधमपूरमध्ये दोन दहशतवाद्यांचा खात्मा

नवी दिल्ली : उधमपूर जिल्ह्यातील माजल्टा परिसरातील जंगलात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले. 'ऑपरेशन सोहान'अंतर्गत १६-१७ सप्टेंबरच्या मध्यरात्री गुप्तचर माहितीच्या आधारे सैन्यदल, जम्मू-काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने संयुक्त शोधमोहीम हाती घेतली होती. प्रतिकूल हवामान, दुर्गम भूप्रदेश आणि कमी दृश्यमानता असतानाही सुरक्षा दलांनी कारवाई केली. गुरुवारी सकाळी वेढा तोडण्यासाठी दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्यानंतर झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला.

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

## पुढील तीन दिवस पावसाचा जोर

मुंबई : राज्यात मान्सूनचा जोर कायम असून, हवामान विभागाच्या अंदाजानुसार १८ ते २० सप्टेंबरदरम्यान राज्यात पावसाचे वातावरण कायम राहणार आहे. १८ सप्टेंबरला कोकणात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. १९ सप्टेंबरला चारही विभागांत काही ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. २० सप्टेंबरला दक्षिण कोकण-गोव्यात अनेक ठिकाणी, तर दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

रायगड | शुक्रवार । दि. १८ सप्टेंबर २०२६ । अंक १०३ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




### वेधक

## मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणारे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला आणखी तीन महिन्यांची मुदत देत आपले उपोषण मागे घेतले असून मुंबई ला जाण्याचा निर्णय स्थगित केला आहे. गुरुवारी पहाटे सरकारच्या शिष्टमंडळाने पाटोदा येथे जाऊन जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्याची विनंती शिष्टमंडळाने केली. या शिष्टमंडळात मराठा पान २ वर

## निवडणूक आयोगावर न्यायालयाचे ताशेरे

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधातील याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले.दोन्ही गटांना स्वतंत्र अंतरिम चिन्हांवर निवडणूक लढण्याची संधी कायमस्वरूपी का दिली नाही, असा रोखठोक सवाल न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी आयोगाला विचारला आहे.



## तरुणाचा बुडून मृत्यू

**महाड :** गणेशोत्सवाचा उत्साह सुरू असतानाच महाड तालुक्यातील कोळ विठ्ठलवाडी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. कुर्ला धरण परिसरातील धबधब्यावर मित्रांसोबत पोहण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय राहुल घाणेकर याचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. कोळ विठ्ठलवाडी पान २ वर

# आधी मागण्या, मग धरण

## सांबरकुंड प्रकल्पग्रस्तांचा निर्धार

### बैठकीत बाधितांना एकजुटीचे आवाहन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**सांबरकुंड मध्यम प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत अद्याप कोणतीच ठोस आणि सकारात्मक चर्चा झालेली नाही. असे असताना केवळ शासकीय प्रक्रिया घडवून धरण उभारणीचा आटापिटा सरकारने सोडावा. बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन आणि भूसंपादन मोबादल्यासह मागण्या सरकारने मान्य केल्या तरच निर्विघ्न पद्धतीने धरणाच्या उभारणीला गती मिळेल, अन्यथा धरणाचा दगड आम्ही लावू देणार नाही, असा निर्धार सांबरकुंड बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.**

तालुक्यातील रामराज ग्रामपंचायत हद्दीतील महान महसुली गावामधील महानवाडी येथील राधाकृष्ण गणेश मंदिरात सांबरकुंड मध्यम प्रकल्पबाधितांनी कायदेशीर आणि अहिंसात्मक लढा देण्याबाबतची रणनीती आखण्यासाठी बैठकीचे नियोजन केले होते. या बैठकीत बाधितांसाठी लढा उभारणाऱ्या संघर्ष समितीने बाधित होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनी एकजुटीसाठी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले.

सांबरकुंड मध्यम प्रकल्प हे राज्याच्या विकासात्मक धोरणातील सुमारे चाळीस वर्षांहून अधिक काळ रखडलेले धरण आहे. या धरणाच्या उभारणीला आता सरकारने गती दिली आहे. या धरण उभारणीमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी धरणाला कधीच विरोध केला नाही. उलट, त्यासाठी सकारात्मकता दाखविली. याचा गैर अर्थ काढीत शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा डाव शासकीय पातळीवर आखला जात असल्याचा आरोप बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.

सांबरकुंड प्रकल्प उभारणीसाठी महसूल प्रशासनाचा तगादा सुरू झाला असला तरी धरण उभारणीसाठी अपेक्षित भूसंपादन करणाऱ्या संपादन शाखेची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. भूसंपादन शाखा म्हणून नेमणूक केलेल्या विभागाने शेतकऱ्यांना केवळ शाब्दिक गोडव्यात गुंडाळून शासनाकडे अंतिम निवाडा मंजूर केला. हा निवाडा मंजूर करताना शेतकऱ्यांना विश्वासात घेतलेले नाही. उलट अंतिम निवाडा मंजूर करून धरणाच्या कामालादेखील विहित वेळेत सुरुवात केलेली नाही, यामुळे अंतिम निवाडा रद्द करून नव्याने अंतिम निवाडा सादर करून मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी शेतकऱ्यांबरोबर चर्चा करावी, अशी मागणी बधितांनी बैठकीत केली.

बाधित शेतकऱ्यांच्या न्यायासाठी लढा देणाऱ्या सांबरकुंड पाच गाव संघर्ष पान २ वर



### रेडिरेकनरचा दर वाढवायला हवा!

अलिबाग तालुक्यात जागेला सोन्याच्या भावापेक्षा दर चढला आहे. याच तालुक्यात गुंठा एक कोटी दराने जमिनी खरेदी केल्या जात आहेत. त्या ठिकाणी सरकारी रेडिरेकनरचा दर वाढत आहे. परंतु, महान महसुली गावाच्या परिसरात रेडिरेकनरचा दर गेल्या दहा वर्षात बदललेला नाही. याचा जाब संबंधित विभागांना विचारून रेडिरेकनरचा दर वाढवायला हवा. तालुक्यात होणाऱ्या सर्वाधिक जमीन खरेदी-विक्रीचे मापक लावून सांबरकुंड बाधितांना भूसंपादनाचा मोबदला द्यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी बैठकीत केली. शेतकऱ्यांच्या जागेला दर निश्चित झालेला नाही, असे असताना धरणाच्या उभारणीच्या अन्य कामांना गती देणे हे शेतकऱ्यांच्या संसारावर नांगर फिरवण्यासारखे असल्याचा संताप बाधितांनी व्यक्त केला.

# चौलमध्ये एलसीबीचा छापा

- ८० हजारांचा मुद्देमाल जप्त
- रेवदंडा पोलीस कारवाईबाबत अनभिज्ञच

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील चौलमध्ये गावठी हातभट्टीचा धंदा राजरोसपणे सुरू असल्याची माहिती थेट स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेपर्यंत पोहोचते, एलसीबीचे पथक छापा टाकून ८० हजारांचा मुद्देमाल जप्त करते; मात्र रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार सुरू असतानाही स्थानिक पोलिसांना त्याचा थांगपत्ता लागत नाही, याबाबत नागरिकांकडून संशय व्यक्त होत आहे. या कारवाईनंतर रेवदंडा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलीस अधीक्षक या प्रकाराची दखल घेणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

अलिबाग तालुक्यातील चौल परिसरात अवैधरित्या गावठी हातभट्टीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली. त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक आशिष दहातोंडे, सहाय्यक पोलीस पान २ वर

## खारघरमध्ये दाम्पत्याला दगडाने मारहाण

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

खारघरमध्ये पहाटेच्या सुमारास दाम्पत्याला दगडाने मारहाण करून त्यांच्याकडील सुमारे ९५ हजार रुपये किमतीचा आयफोन १५ प्रो मॅक्स लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी खारघर पोलिसांनी रबिलाल रोबन टुडू (३२) याला अटक केली आहे.

कोपरा गावाच्या पुढे, खारघर टोलनाक्याजवळ गणपती तलावाकडे जाणाऱ्या पादचारी पुलावर ही घटना घडली. तक्रारदार प्रगती पान २ वर

## जिल्ह्यात भेसळखोरांना दणका!

- अन्न व औषध प्रशासन ॲक्शन मोडवर
- ८९ लाख ५८ हजार १४५ रुपयांचा साठा जप्त

**। प्रमोद जाधव ।**

**। रायगड ।**

प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर रायगडच्या अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यात तब्बल ३९ ठिकाणी छापे टाकून ८९ लाख ५८ हजार १४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भेसळखोर आणि नियमबाह्य अन्नपदार्थ विक्रेत्यांवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. या काळात दूध व दुग्धजन्य पदार्थांसह लाडू, चिवडा, मिठाई, खवा, पनीर आणि रेडीमेड अन्नपदार्थांची मागणी वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर पान २ वर

## सोनपावलांनी गौराई आली घरा...



वर्षभरानंतर आलेल्या माहेरवाशीण गौराईच्या आगमनाने संपूर्ण माहोल बदलून गेला असून, उत्साह आणि आनंदाचे वातावरण आहे. घरोघरी गौराईचे मोठ्या थाटामाटात सुवासिनींनी स्वागत केले. शुक्रवारी गौराईची प्राणप्रतिष्ठा करुन तिचा मानपान करण्यात येणार आहे. अलिबागमधील महिला आपल्या लाडक्या गौराईला घरी घेऊन जाताना.

(छायाचित्र : समीर मालोदे)

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल येथे राहणाऱ्या २४ वर्षीय तरुणाने १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. तसेच पीडितेचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी तुर्भे पोलिसांनी तरुणाला अटक केली आहे.

पीडित मुलगी महाड येथे राहणारी असून, आरोपी पनवेल येथे राहतो. दोघेही नेरूळ येथील हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेत असल्याने त्यांची ओळख झाली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने १७ पान २ वर

# ज्येष्ठ पत्रकार अरुण जाधव यांचे निधन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील अनेकविध क्षेत्रात कार्यरत राहिलेले ज्येष्ठ पत्रकार अरुण दा. जाधव यांचे गुरुवारी सकाळी राहत्या घरी प्रकृती अस्वास्थ्यामुळे निधन झाले. पोलादपूर तालुक्यात ऐन गणेशोत्सवात झालेल्या या दुःखद घटनेमुळे शोककळा पसरली आहे.

पोलादपूर तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात रायगड शिक्षण प्रसारक मंडळाच्या देवळे हायस्कूलमध्ये काही वर्षे नोकरी केल्यानंतर सहकार क्षेत्रातील दूध उत्पादक संघ, शेतकरी बाजार, जिजामाता को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्था, नवयुग विद्यापीठ, महाड पोलादपूर तालुका पत्रकार संघ या संस्था व संघटनांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांशी संलग्न राहिले.



याचदरम्यान, दैनिक कुलाबा शिवतेज वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक म्हणून अरुण जाधव यांनी १५ वर्षांहून अधिक काळ पत्रकारिता केली. कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी लिहिलेले रपेट हे चौफेर स्तंभलेखन तसेच अग्रलेख रायगड जिल्ह्यात विशेष गाजले. पद्मश्री डॉ. हिंमतराव बावस्कर यांच्या संशोधन कार्याप्रती अरुण जाधव यांच्या लेखणीतून विशेष आपुलकी व अभिमान व्यक्त होत असे.

पोलादपूर शहरातील स्मशानभूमीत तालुक्यातील शेकडो नागरिकांच्या उपस्थितीत ज्येष्ठ पत्रकार अरुण पान २ वर

### रायगडातील ६४ केंद्रचालक आर्थिक संकटात | दोन लाख गरजूंच्या भोजनाचा प्रश्न ऐरणीवर

# शिवभोजन केंद्रेच अनुदानापासून 'उपाशी'

**धनाजी घरत**

**। खरोशी ।**

गोरगरीब आणि गरजू नागरिकांना अवघ्या १० रुपयांत पोटभर जेवण देणाऱ्या शिवभोजन केंद्रांवरच आता आर्थिक संकट ओढवले आहे. रायगडातील ६४ शिवभोजन केंद्रांना तब्बल महिनोन्महिने अनुदान मिळाले नसल्याने केंद्रचालक आर्थिक कोंडीत सापडले आहेत. कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून केंद्रे सुरू ठेवण्याची वेळ काही चालकांवर आली असून, निधीचा प्रश्न लवकर सुटला नाह तर या योजनेवर अवलंबून असलेल्या सुमारे २ लाख गरीब व गरजू नागरिकांच्या भोजनाचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

समाजातील गरीबातला गरीब व्यक्ती उपाशीपोटी झोपू नये, यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी झुणका-भाकर केंद्रे उभारली होती. त्याच धर्तीवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवभोजन केंद्रे सुरू करून गोरगरीब जनतेच्या भोजनाची व्यवस्था केली. कोरोना काळात तत्कालीन राज्य सरकारने शिवभोजन मोफत देऊन गरजू नागरिकांना आधार दिला होता. सध्या रायगड जिल्ह्यातील शिवभोजन केंद्रांमधून दररोज सुमारे २ लाख गरीब व गरजू नागरिकांना भोजनाचा लाभ मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. एका थाळीसाठी नागरिकांकडून केवळ १० रुपये आकारले जातात. राज्य शासनाकडून शहरी भागातील केंद्रांना प्रति थाळी ४० रुपये, तर ग्रामीण भागातील केंद्रांना २५ रुपये अनुदान दिले जाते. यासाठी वर्षाला सुमारे २७० कोटी रुपये शासनाकडून खर्च करण्यात येतात.

रायगड जिल्ह्यात ६४ शिवभोजन केंद्रे कार्यरत असून, ८ हजार दैनंदिन थाळ्यांना मंजुरी आहे. थाळ्यांच्या वितरणानुसार केंद्रांना दरमहा साधारण ५७ लाख रुपयांच्या अनुदानाची आवश्यकता असते. मात्र, नोव्हेंबर २०२५पासून म्हणजेच मागील १० महिन्यांपासून राज्य शासनाकडून या केंद्रचालकांना एकही रुपया मिळाला पान २ वर

### सुधागडमध्ये १३ महिन्यांपासून प्रतीक्षा?

पनवेल तालुक्यातील केंद्रांना अद्याप १० महिन्यांचे अनुदान मिळाले नसल्याचे सांगण्यात येत असताना, सुधागड तालुक्यातील तीन शिवभोजन केंद्रांना मागील १३ महिन्यांपासून अनुदान मिळाले नसल्याचा दावा केंद्रचालकांनी केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा विभागातील कर्मचारी दीपक मुळे यांनी पनवेल तालुक्यातील केंद्रांची बिले उशिरा आल्याने काही केंद्रांचे पैसे अदा करणे राहिले असल्याचे सांगितले.

> ३ सप्टेंबर २०२६ रोजी शिवभोजन केंद्रांची मे २०२६ पर्यंतची देयके अदा करण्यासाठी ३ कोटी ७७ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले असून, शिवभोजन केंद्रांची देयके देण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच मे महिन्यानंतरची अनुदानाची रक्कम पुढील निधी प्राप्त झाल्यानंतर वितरित करण्यात येणार आहे.
>
> - डॉ. रवींद्र शेळके, उपजिल्हाधिकारी, रायगड



# जिल्ह्यात गुटखा विक्रीला उधाण

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गुटखा बंदी कागदावरच आणि प्रत्यक्षात मात्र पान टपरीपासून किराणा दुकानापर्यंत गुटख्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचे चित्र आहे. पेण-खोपोली बायपास मार्गावरून येणाऱ्या मोठ्या वाहनांद्वारे जिल्ह्यात विविध ठिकाणी गुटख्याचा पुरवठा होत असल्याची चर्चा आहे. रसायनी हे गुटखा वितरणाचे केंद्र ठरत असल्याचे बोलले जात असून, पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या भूमिकेवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

जिल्ह्यात गुटखा, तंबाखू तसेच अंमली पदार्थांची वाहतूक, विक्री आणि निर्मितीला बंदी असतानाही या अवैध धंद्याला पुन्हा वेग आल्याचे



चित्र आहे. काही तासांतच मोठ्या प्रमाणात गुटखा विविध ठिकाणी पोहोचविला जात असल्याची चर्चा असून, पान टपरीपासून किराणा दुकानापर्यंत चढ्या दराने गुटख्याची विक्री होत असल्याचे सांगितले जात आहे.

सध्या १५ ते २० रुपयांना मिळणारा गुटखा बाजारात ३५ ते ४० रुपयांना विकला जात असल्याचे बोलले जात आहे. अलिबाग, पोयनाड, रोहा, माणगाव, महाड आणि रसायनी परिसरात गुटखा विक्री सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे गुटखा बंदी असतानाही हा व्यवसाय तेजीत कसा, असा सवाल उपस्थित होत आहे.

रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंदे, गुटखा, मटका, जुगार आणि अंमली पदार्थांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली होती. स्थानिक पोलीस ठाण्यांना कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आणि विविध ठिकाणी गुन्हेही दाखल झाले. त्यामुळे नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले होते. मात्र, सध्या पुन्हा गुटखा विक्रीला वेग आल्याने पोलिसांची कारवाई केवळ दिखावा ठरली का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यातील मोठ्या अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असतानाही गुटखा वितरण

- **रसायनी वितरणाचे केंद्र?**
- **पान टपरीपासून किराणा दुकानापर्यंत सुळसुळाट**
- **पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह**

करणाऱ्यांवर ठोस कारवाई का होत नाही, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. रसायनीमधून जिल्ह्यातील विविध भागांत गुटख्याचा पुरवठा होत असल्याच्या चर्चेची पोलिसांनी दखल घेऊन या अवैध साखळीचा छडा लावणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## कारच्या धडकेत महिला गंभीर जखमी

**रसायनी** : पराडे कॉर्नर, रसायनी येथे भरधाव कारने मोटारसायकलला धडक देऊन अपघात केल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० ते १६ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० या कालावधीत घडली. या अपघातात मोटारसायकलस्वारास किरकोळ दुखापत झाली, तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली. त्यांच्या सहा वर्षांच्या मुलीला आणि एक वर्षाच्या मुलालाही दुखापत झाली असून, अपघातानंतर कारचालक घटनास्थळी न थांबता पसार झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पराडे कॉर्नर येथे अज्ञात चालकाने सफेद रंगाची कार अतिवेगाने व हयगयीने चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत मोटारसायकलला धडक दिली. या धडकेत मोटारसायकलचेही नुकसान झाले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**म्हसळा** : अल्पवयीन मुलीवर वेगवेगळ्या वेळी लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात म्हसळा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑगस्ट २०२५ ते जुलै २०२६ या कालावधीत हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी क्रमांक १ याने त्याच्या मित्रांसह पीडित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही तिला वेगवेगळ्या कारणांवरून ताम्हाणे गावातील डागीजवळ बोलावून तिच्यासोबत शारीरिक संबंध केल्याचा आरोप आहे. तसेच एप्रिल ते जून २०२६दरम्यान घराच्या कामासाठी आलेल्या आरोपी क्रमांक ५ यानेही घरात कोणी नसल्याचा फायदा घेत तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


### नोटीस

दिनांक : १८/०९/२०२६

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) जान्हवी महेश वाणी, २) मोहिनी महेश वाणी यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | ९१२ | ०-८८-५०<br>पो.ख. ०-०८-७०<br>एकुण ०-९८-२० | २०.६४ |

वर नमुद मिळकतीमधील १) जान्हवी महेश वाणी, २) मोहिनी महेश वाणी, यांच्या मालकीचे खाते क्र.३११५ क्षेत्र ०-०१-५० हे.आर., आकार ०.३५ रु. पैसे या मिळकतीबाबत.

दिनांक : १८/०७/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२


## अत्याचारप्रकरणी दोघांना अटक

**नेरळ** : अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याप्रकरणी नेरळ पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. ही घटना जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत नेरळ येथील हजारे नगर परिसरातील एका सदनिकेत घडल्याचे पोलिसांनी नोंदविलेल्या गुन्ह्यात नमूद केले आहे. दोन्ही आरोपींना १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.५७ वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, अल्पवयीन पीडिता तिच्या मित्रांसह आरोपींच्या संपर्कात होती. आरोपींना पीडिता अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही त्यांनी तिच्यासोबत शारीरिक लगट करून तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले. त्यातून पीडिता गर्भवती झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात अधिक पोलीस उपनिरीक्षक वरक तपास करीत आहेत.

# कंटेनर २५० फूट खोल दरीत कोसळला

। कोलाड । प्रतिनिधी ।

कोलाड-पुणे मार्गावरील पहूर फाटा ते वळंजवाडी गावादरम्यान मालवाहू कंटेनर तब्बल २५० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला. बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या अपघातात चालक व क्लीनर जखमी झाले. सुदैवाने या दुर्घटनेत जीवितहानी टळली. मात्र, कंटेनरमध्ये गंभीर अवस्थेत अडकलेल्या चालकाची सुटका करणे रेस्क्यू पथकासमोर मोठे आव्हान ठरले.

मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनरमधून चालक आणि क्लीनर प्रवास करीत होते. अपघातानंतर क्लीनर कंटेनरमधून बाहेर पडण्यात यशस्वी झाला. त्याला किरकोळ दुखापत झाली. मात्र, चालक कंटेनरमध्येच अडकून पडला होता. घटनेची माहिती मिळताच रेस्क्यू टीम, कोलाड पोलीस आणि येरुणकर क्रेन सर्व्हिस घटनास्थळी दाखल झाले.



रेस्क्यू पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असता कंटेनर सुमारे २५० फूट खोल दरीत कोसळल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे कंटेनर एका झाडाच्या आधारावर धोकादायक अवस्थेत अडकला होता. कंटेनर आणखी घसरल्यास तो सुमारे ५०० फूट खोल दरीत कोसळण्याची शक्यता होती. त्यामुळे चालकाची सुटका करताना प्रत्येक हालचाल अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक

- **चालकाची थरारक सुटका**
- **कोलाड-पुणे मार्गावरील अपघात**
- **पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर रेस्क्यू टीमला यश**

होते. कंटेनरला सुरक्षितपणे स्थिर करण्यासाठी येरुणकर क्रेनच्या मदतीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. त्यानंतर रेस्क्यू पथकाने सुरक्षिततेची खात्री करत चालकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अत्यंत प्रतिकूल आणि जोखमीच्या परिस्थितीत तब्बल पाच तास रेस्क्यू ऑपरेशन सुरू होते.

अखेर रेस्क्यू टीम, येरुणकर क्रेन सर्व्हिस आणि कोलाड पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले.

## बेपत्ता व्यक्तीचे अपहरण?

**खोपोली** : उंबरे गावच्या हद्दीतून २७ जुलै रोजी सायंकाळी बेपत्ता झालेल्या व्यक्तीला अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी खालापूर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती २७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेली. त्यानंतर ती अद्यापपर्यंत मिळून आलेली नाही. अज्ञात व्यक्तीने तिला कोणत्यातरी कारणासाठी पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक रासकर करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे तळवाडे, ता.कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.मुरलीधर शंकर मसणे वगैरे यांचेकडुन आमचे अशिलांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे तळवाडे, ता.कर्जत, जि.रायगड येथील सर्व्हे नं.४५ हिस्सा नं.२/अ/२ एकूण क्षेत्र ०.७२.०० (हे.आर.चौ.मी.) आकारणी ३.६२ (रु.पै.) या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ०.२१.०० (हे.आर.चौ.मी.) क्षेत्राची मिळकत तदंगभुत सर्व हक्क हितसंबंधा सह कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क, कायदेशीर प्रकरण वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत खाली नमूद केलेले खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास परंतु त्यांनी वर नमूद केलेल्या मुदतीत हरकत न पाठविल्यास ती हरकत त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट
पत्ता :-''श्री सदगुरू कृपा'', १४४अ,
मु.पो.शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबाईल नं. ९८६०६२६२४६


## पान १ वरुन

### मनोज जरांगे पाटलांचे उपोषण मागे

उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, आमदार प्रसाद लाड, आमदार सुरेश धस आणि आमदार दादासाहेब भुसे यांचा समावेश होता.

शिष्टमंडळाने दिलेल्या माहितीनुसार, तीन महिन्यांत ५८ लाख नोंदींचे दाखले वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, तसेच हैदराबाद गॅझेटिअरनुसार व्हॅलिडिटी आणि सातारा गॅझेटिअरच्या अंमलबजावणीसाठीही आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

दरम्यान, सरकारला यापूर्वीही पुरेसा वेळ दिला आहे. मात्र, आता आणखी तीन महिन्यांची मुदत देत असून, या कालावधीत मागण्यांची अंमलबजावणी झालीच पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली.

यापुढे उपोषण करणार नाही; मात्र मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही, तर कोट्यवधी मराठे मुंबईत ठाण मांडून बसतील, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला. त्यामुळे पुढील तीन महिन्यांत सरकारकडून या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली जाते, याकडे मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

### आधी मागण्या, मग धरण

समितीने केलेल्या मागण्यासंदर्भात शासन पातळीवर बैठकीचे आयोजन करण्यात यावे त्या बैठकीमध्ये होणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयानंतर धरणाच्या अन्य कामांना सुरुवात करावी, अद्याप पुनर्वसन आराखडा मंजूर नाही, सोशल इम्पॅक्ट सर्वे केलेला नाही, शेतकऱ्यांच्या जागेला दर निश्चित झालेला नाही, असे असताना धरणाच्या उभारणीच्या अन्य कामांना गती देणे हे शेतकऱ्यांच्या संसारावर नांगर फिरवण्यासारखे आहे, असे आक्रमक बोल बधितांनी प्रकट केले.

अलिबाग तालुक्यात जागेला सोन्याच्या भावापेक्षा दर चढला आहे. याच तालुक्यात गुंठा एक कोटी दराने जमिनी खरेदी केल्या जात आहेत. त्या ठिकाणी सरकारी रेडिरेकनरचा दर वाढत आहे. परंतु, महान महसुली गावाच्या परिसरात रेडिरेकनरचा दर गेल्या दहा वर्षात बदललेला नाही. याचा जाब संबंधित विभागांना विचारून रेडिरेकनरचा दर वाढवायला हवा. तालुक्यात होणाऱ्या सर्वाधिक जमीन खरेदी-विक्रीचे मापक लावून सांबरकुंड बधितांना भूसंपादनाचा मोबदला द्यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी बैठकीत केली.

### तरुणाचा बुडून मृत्यू

येथील रहिवासी राहुल घाणेकर हा बुधवारी दुपारच्या सुमारास मित्रांसोबत कुर्ला धरणाजवळील धबधब्यावर पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने राहुल पाण्यात बुडाला. त्याच्यासोबत असलेल्या मित्रांनी मदतीसाठी आरडाओरड केल्यानंतर साळुंखे रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. रेस्क्यू टीमने शर्थीचे प्रयत्न करून राहुलला पाण्याबाहेर काढले. त्यानंतर त्याला तातडीने महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. गणेशोत्सवाच्या काळातच गावातील तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने कोळ विठ्ठलवाडी गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेने राहुलच्या कुटुंबियांसह मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेचा पुढील तपास महाड पोलीस ठाणे करीत आहे.

### शिवभोजन केंद्रेच अनुदानापासून ‘उपाशी’

नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे केंद्रे कशी चालवायची, असा प्रश्न चालकांसमोर उभा राहिला आहे. काही केंद्रचालकांनी कर्ज काढून, तर काहींनी दागिने गहाण ठेवून केंद्रे सुरू ठेवली आहेत.

पनवेल तालुक्यात पूर्वी १९ शिवभोजन केंद्रे होती. त्यापैकी दोन केंद्रे वेळेवर अनुदान न मिळाल्यामुळे बंद पडल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे इतर केंद्रांवरही संकटाची टांगती तलवार आहे.

दरम्यान, सांगली जिल्ह्यातील पलूस येथील शिवगंगा शिवभोजन केंद्राचे संचालक संजय पाटील व मनीषा संजय पाटील या दाम्पत्याने ६ सप्टेंबर रोजी आत्महत्या केल्याची घटना ताजी आहे. आर्थिक अडचणींमुळे शिवभोजन केंद्र चालकांवर वाढता ताण अधोरेखित होत असताना रायगडमधील केंद्रांच्या थकीत अनुदानाचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

### चौलमध्ये एलसीबीचा छापा

निरीक्षक सचिन कुलकर्णी, पोलीस हवालदार रुपेश निगडे, पोलीस शिपाई प्रशांत लोहार, महिला पोलीस हवालदार भाग्यश्री पाटील आणि अभियंती मोकल यांच्या पथकाने शनिवारी छापा टाकला. या कारवाईत सुमारे ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याठिकाणी बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टी तयार करून दारू विक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे कारवाईत समोर आले. एलसीबीच्या पथकाने कारवाई करत या अवैध व्यवसायाला आळा घातला. मात्र, या कारवाईनंतर स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित झाले आहेत. चौल परिसर रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येतो. असे असताना अवैध हातभट्टीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती एलसीबीला मिळते आणि स्थानिक पोलिसांना त्याची माहिती नसते, यामागचे कारण काय? बीट पोलिसांकडून हद्दीत नियमित गस्त आणि माहिती संकलन केले जाते की नाही? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

चौल परिसरातील अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवणे आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखणे ही स्थानिक पोलिसांची जबाबदारी असताना एलसीबीला थेट कारवाई करावी लागल्याने रेवदंडा पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीची चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणात संबंधित बीटवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून खुलासा मागविला जाणार का, तसेच वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेणार, याकडे आता लक्ष लागले आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे यांच्याकडे सध्या ठाण्याची जबाबदारी आहे. त्यांच्या हद्दीत अशा प्रकारचा अवैध व्यवसाय सुरू असल्याचे एलसीबीच्या कारवाईत समोर आल्याने स्थानिक नागरिकांकडून पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, या कारवाईच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इतर अवैध धंद्यांवरही वरिष्ठ पोलीस अधिकारी कारवाई करणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**चोरट्यांना अभय, तक्रारदारांना त्रास?**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी, घरफोडीसह विविध गुन्हे घडत असतानाही त्यातील काही गुन्ह्यांची उकल अद्याप झालेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. चौलमधील दत्त मंदिरातील चोरीचा तपासही अद्याप प्रलंबित असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. घरफोडी अथवा चोरीची तक्रार घेऊन पोलीस ठाण्यात जाणाऱ्या नागरिकांना योग्य वागणूक मिळत नसल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे ‘‘चोरट्यांना अभय आणि तक्रारदारांनाच त्रास?’’ असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कथित मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे. या सर्व तक्रारींची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### खारघरमध्ये दाम्पत्याला दगडाने मारहाण

सुरेश घंगाळे ऊर्फ प्रगती रोहन खिलारी (२९) आणि त्यांचे पती रोहन खिलारी हे तेथून जात असताना एका अनोळखी व्यक्तीने त्यांना दगडाने मारहाण केली. त्यानंतर आरोपीने दाम्पत्याकडील ९५ हजार रुपये किमतीचा आयफोन १५ प्रो मॅक्स घेऊन घटनास्थळावरून पलायन केले. या मोबाइलमध्ये जिओ आणि एअरटेल कंपनीची सिमकार्ड असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या हल्ल्यात रोहन खिलारी जखमी झाले.घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी तपास सुरू करून आरोपी रबिलाल टुडू याला अटक केली. याप्रकरणी पुढील तपास खारघर पोलीस करीत आहेत.

### जिल्ह्यात भेसळखोरांना दणका!

नागरिक आणि भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम तीव्र केली आहे.भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्यांवर नजर ठेवण्यात येत असून, दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी विशेष कारवाई केली जात आहे. सहाय्यक आयुक्त मिलींद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबागसह जिल्ह्यातील विविध भागांत पथकांकडून कारवाईचे सत्र सुरू आहे.

प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानदारांसह कंपन्यांवरही कारवाई करण्यात आली आहे. आतापर्यंत ८९ लाख ५८ हजार १४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.दरम्यान, जिल्ह्यात ३१० अन्न नमुने तपासण्यात आले. त्यापैकी १०७ नमुने प्रमाणित, तर ८ नमुने अप्रमाणित व असुरक्षित असल्याचे समोर आले. त्यानुसार अप्रमाणित व असुरक्षित पदार्थ ठेवणाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

अन्नपदार्थांबाबत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांच्या दुकानांची तपासणी करण्यात आली. यामध्ये १२९ जणांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या, तर ८ व्यावसायिकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांसह दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

**सणासुदीच्या दिवसांमध्ये मिठाई, मावा उत्पादक आस्थापनांची तपासणी करण्यात येत आहे. हॉटेल, रेस्टॉरंटबाबतही तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात अन्नपदार्थांमध्ये भेसळ अथवा अन्य नियमबाह्य प्रकार होत असल्यास नागरिकांनी संपर्क साधावा.**

**– मिलींद महांगडे, सहाय्यक आयुक्त,**
**अन्न व औषध विभाग, रायगड**

### ज्येष्ठ पत्रकार अरुण जाधव यांचे निधन

जाधव यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

अरुण जाधव यांच्या पश्चात पत्नी, मुलगा एनडीटीव्ही मिडिया पर्सन राहुल जाधव व इंजिनिअर प्रणाम, मुली निवेदिता, शिल्पा आणि रुपाली तसेच जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

ऑगस्ट रोजी पीडितेला नेरूळ येथून मोटारसायकलवरून पनवेल येथील आपल्या घरी नेले. तेथे लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर पीडितेचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत पुन्हा अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेनंतर घाबरलेल्या पीडितेने सुरुवातीला याबाबत कोणालाही माहिती दिली नाही. मात्र, गेल्या आठवड्यात तिने तुर्भे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून १४ सप्टेंबर रोजी त्याला अटक केली.

या प्रकरणी बलात्कार, पॉक्सो तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाशी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त आदिनाथ बुधवंत यांनी कारवाईची माहिती दिली. पुढील तपास तुर्भे पोलीस करीत आहेत.


### सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्व जनतेस **सूचना** देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही, येथे खालील **अनुसूची**मध्ये सविस्तर वर्णन केलेल्या जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, गाव सोगाव येथील गट/सर्व्हे क्रमांक ८५ (संबंधित जुना सर्व्हे क्रमांक ६१/२ए) असलेला मोजमापीत ८,४०० चौरस मिटर्स जमिनीबाबत (“**जमीन**”) रेहाना हाईटस, फ्लॅट नं. ३०२, सुपर बाजार समोर, चापल लेन, ऑफ एसवी रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई - महाराष्ट्र ४०००५४ येथ राहणारे वय ६० वर्षे, भारतीय व्यक्ती **श्री. खोझेम सिराज कॉन्ट्रॅक्टर** (“**मालक**”) यांच्या मालकी अधिकाराची, मालकी हक्काची, आणि हितसंबंधाची आम्ही चौकशी करीत आहोत, कारण आमचे अशिल जमीन कोणत्याही प्रकारच्या बोज्यापासून मुक्त अशा स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह संपादन करण्यासाठी मालकासोबत वाटाघाटी करीत आहेत.

कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींचे / एन्टीटींजचे / संस्थेचे जमीन किंवा तीच्या कोणत्याही भागा मध्ये किवा वर विक्री, विक्री करार, सामंजस्य करार, हस्तांतरण, नियुक्ती, विनिमय, वाटणी, भार, ऋणभार, कुळ, उप–कुळ, भाडेपट्टी, उप–भाडेपट्टी, परवाना, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), वारसा, वहिवाट, ताबा, विभाजन, हिस्सा, भेट, इच्छापत्राद्वारे देणे, धारणाधिकार, देणी, विकास हक्क प्रदान करुन, देखभाल, सुविधाधिकार, मार्गाचा अधिकार, विश्वस्त, प्रसंविदा किंवा अट, मुक्तता, हक्क त्याग, संपादन, मागणी, कोणत्याही ट्रस्ट अंतर्गत कोणताही बोजा किंवा फायदेशीर हक्क/हित, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणत्याही दस्तऐवज, करार, डीड, कागदापत्रे, लिखान, अभिहस्तांतरण पत्राद्वारे इतर कोणत्याही पद्धतीने, मृत्युपत्र, वारसाहक्क, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, एफएसआय, विल्हेवाट, खटला, कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाने किंवा लवादाने पारित केलेली डिक्री किंवा आदेश किंवा निवाडा किंवा मनाई आदेश किंवा जप्ती किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा हिस्सा, अधिकार, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा मागणी (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) (“**दावे**”) असल्यास त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीकर्त्याला खैतान ॲण्ड कंपनी, ॲडव्होकेट, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री हर्ष परिख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसांच्या कालावधीत संपूर्ण आणि प्रमाणित सत्यप्रति पुराव्यासह लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, असे न केल्यास, संबंधित दावेदारांनी असे दावे सोडून दिले आहेत किंवा सर्व उद्देशांसाठी आणि प्रयोजनासाठी जाणीवपूर्वक त्या दाव्यांचा हक्क सोडला आहे, त्याकडे दुर्लक्ष केले आहे, त्याग केला आहे आणि मूक संमती दिली आहे आणि ते दावे यापुढे मालक आणि/किंवा आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही असे समजले जाईल.

**अनुसूची**
**(जमिनीचे वर्णन)**

रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यामधील सोगाव गावात स्थित गट/सर्व्हे क्रमांक ८५ (संबंधित जुना सर्व्हे क्रमांक ६१/२ए) असलेला मोजमापीत ८,४०० चौरस मिटर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड.
जमिनीच्या चर्तु:सीमा खालीलप्रमाणे:
उत्तरेकडे किंवा त्या दिशेला : गट/सर्व्हे क्रमांक ९२
दक्षिणेकडे किंवा त्या दिशेला : गट/सर्व्हे क्रमांक ८४
पूर्वेकडे किंवा त्या दिशेला : नाला, गट/सर्व्हे क्रमांक ८२ आणि गट/सर्व्हे क्रमांक ८३
पश्चिमेकडे किंवा त्या दिशेला : रस्ता
आज दिनांक १८ सप्टेंबर २०२६

खैतान अँड कंपनी करीता
सही /-
हर्ष परिख
भागीदार



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# गौराईच्या आगमनाने उत्साहाचे वातावरण

| उरण | प्रतिनिधी |

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत विशेष स्थान असलेल्या गौरी-गणपती उत्सवाला सुरुवात होताच घराघरांत भक्ती आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गणपती बाप्पाच्या आगमनानंतर गौरीच्या आगमनाची चाहूल लागल्याने महिला वर्गासह लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये उत्साह संचारला होता. दरम्यान, गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमत असतातना महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यात गुरूवारी (दि.१७) गौराईच्या स्वागतासाठी घराघरांत जय्यत तयारी करण्यात आली होती.

गणपती बाप्पाला बुद्धी, विवेक आणि मंगलतेचे प्रतीक मानले जाते, तर गौराईला सुख-समृद्धी, सौभाग्य आणि मातृशक्तीचे प्रतीक मानण्याची परंपरा आहे. त्यामुळे गौरी-गणपतीचा उत्सव हा धार्मिक श्रद्धेबरोबरच महाराष्ट्राच्या

## आज पारंपरिक पद्धतीने पूजन



● (छायाचित्रः सुधीर नाझरे)

कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाशी घट्ट जोडलेला आहे. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांमध्ये गौराईला माहेरवाशीण मानले जाते. गणपती बाप्पाच्या आगमनानंतर गौरी आपल्या माहेरी येते, अशी श्रद्धा असल्याने तिचे स्वागत घरातील लेकीप्रमाणे केले जाते. यादरम्यान घराची स्वच्छता, आकर्षक सजावट, रांगोळी, फुलांची आरास आणि पारंपरिक पद्धतीने गौरईची स्थापना करून पूजन केले जाते. अनेक ठिकाणी गौराईला साडी, दागिने आणि विविध अलंकारांनी सजविण्यात येते. दरम्यान, गणेशोत्सवासह गौरी पूजन पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्याचे आवाहनही करण्यात येत आहे. सजावटीमध्ये प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे, निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि पाण्याची बचत करणे यावर देखील भर दिला जात आहे. त्यामुळे भक्तीबरोबर पर्यावरणाचे भान राखण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

यावेळी जिल्ह्यात गुरूवारी (दि.१७) गौराईचे आगमन झाले असून, शुक्रवारी (दि.१८) गौरी पूजनाच्या दिवशी घरातील महिलांकडून विविध पारंपरिक पदार्थांचा नैवेद्य तयार केला जातो. त्यात पुरणपोळी, विविध भाज्या, भाकरी, खीर, लाडू, करंजी, मोदक यांसह अनेक पदार्थांची रेलचेल पाहावयास मिळते. तसेच, यानिमित्ताने पारंपरिक पाककलेला उजाळा मिळत असून, जुन्या पिढीकडून पुढील पिढीकडे अनेक खाद्यपरंपरा पोहोचत आहेत. त्याचबरोबर अनेक घरांमध्ये हळदी-कुंकवाचे कार्यक्रमही आयोजित केले जातात. यावेळी सुवासिनींना आमंत्रित करून त्यांचा सन्मान केला जातो. त्यामुळे महिलांना एकत्र येण्याची संधी मिळते. आप्तेष्टांच्या भेटीगाठी, प्रसादाची देवाणघेवाण आणि कौटुंबिक संवादामुळे नात्यांमध्ये आपुलकी वाढते.

गौरी-गणपती उत्सव हा महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यात श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम मानला जातो. भक्तीच्या वातावरणात कुटुंब एकत्र येते, नात्यांना उजाळा मिळतो आणि संस्कृतीचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचतो. त्यामुळे बदलत्या काळातही गौरी-गणपती उत्सवाची परंपरा आणि त्यामागील भावनिक नाते आजही तितकेच जिवंत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. दरम्यान, गौराईच्या आगमनानंतर काही दिवस घरात उत्साहाचे वातावरण असते. मात्र, गौराईच्या निरोपाचा क्षण मात्र भावनिक असतो. यावेळी शनिवारी (दि.१९) माहेरवाशीण म्हणून आलेल्या गौराईला निरोप देण्यात येणार असून, पुढील वर्षी पुन्हा तिचे आगमन व्हावे, कुटुंबात सुख-शांती नांदावी आणि सर्वांचे आरोग्य उत्तम राहावे, यासाठी प्रार्थना केली जाईल.

### नव्या पिढीला संस्कृतीची ओळख

गौरी-गणपती उत्सवाच्या माध्यमातून नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख करून देण्याचे कामही होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वाढणाऱ्या मुलांना पूजनपद्धती, पारंपरिक सजावट, रांगोळी, नैवेद्य आणि कुटुंबातील ज्येष्ठांकडून सांगितल्या जाणाऱ्या परंपरांमुळे आपल्या सांस्कृतिक मुळांशी जोडले जात आहे.

### स्त्रीशक्तीला मानाचे स्थान

गौरी पूजनामध्ये स्त्रीशक्तीला मानाचे स्थान दिले जाते. कुटुंबाच्या सुख दुःखात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महिलांच्या योगदानाचा सन्मान या उत्सवातून अधोरेखित होतो. त्यामुळे गौरीचा सण हा धार्मिक उत्सवाबरोबरच कौटुंबिक मूल्ये आणि सामाजिक नातेसंबंध दृढ करणारा उत्सव ठरतो.

## सोन्याच्या पावलांनी गौराईचे आगमन



● (छायाचित्रः गणेश चोडणेकर)

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड शहरात गणेशोत्सवानंतर आता लाडक्या गौराईचे आगमन झाले आहे. शहर व परिसरातील महिला देवीची प्रतिकृती असलेले मुखवटे तसेच तेरड्याची रोपे घेऊन गौराईच्या स्वागतासाठी सज्ज झाल्या होत्या. गुरूवारी (दि.१७) "गौराई आली सोन्याच्या पावलांनी आणि गौराई आली माणिक-मोतीच्या पावलांनी," असे म्हणत तब्बल साडेसहाशे गौराईंचे आगमन मुरूड शहरात झाले आहे. दरम्यान, गौराईच्या आगमनामुळे घराघरांत उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, शुक्रवारी (दि.१८) गौराईची विधिवत पूजा थाटामाटात केली जाणार आहे. त्यासाठी महिलांनी घरांची स्वच्छता, सजावट तसेच पूजेची जय्यत तयारी केली आहे. यादरम्यान, पारंपरिक पद्धतीने गौराईचे स्वागत करून विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

## निवडक

### बौद्धिक दिव्यांग संस्था प्रथम

**पनवेल :** खारघर येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सक्षमीकरण संस्थेने इनरव्हील क्लबच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'नृत्य आणि संगीत स्पर्धे'त उल्लेखनीय यश संपादन केले. या संस्थेने नृत्य तसेच संगीत या दोन्ही विभागांत प्रथम क्रमांक पटकावत मानाच्या चषकावर आपले नाव कोरले. खारघर येथील इनरव्हील क्लबच्यावतीने नुकतीच जिल्हास्तरीय नृत्य व संगीत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत नवी मुंबई परिसरातील एकूण आठ विशेष शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाला इनरव्हील क्लबचे पदाधिकारी, विशेष विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, विशेष शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सक्षमीकरण संस्थेने नृत्य आणि संगीत या दोन्ही विभागांत प्रथम क्रमांकाची मानाचे चषक पटकावले. यावेळी दोन्ही स्पर्धांमध्ये संस्थेच्या एकूण ३२ विशेष विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या नवी मुंबई प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

## ७४ हजारांच्या ऐवजाची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल पोलीस ठाण्यात ७४ हजार रुपयांच्या ऐवजांची चोरी केल्याप्रकरणी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. युनिक आरकेसी प्रोजेक्ट एलएलपी कंपनीच्या रूट्स फार्म हाऊसच्या पाठीमागे आंबे शिरवली येथे वडोदरा-मुंबई महामार्गाचे काम सुरू आहे. त्यामुळे याठिकाणी पीक्यूसी पेवर मशीन ऑपरेटरने उभी करून ठेवली होती. दरम्यान, या ठिकाणी कोणी नसल्याच्या फायदा घेत चोरट्यांनी मशीनमधील एक्साइड कंपनीच्या दोन बॅटऱ्या, मशीनच्या वापरण्यात येणाऱ्या स्टेरिंग सिलेंडर बकेट चोरून नेले.

## रोह्यात काँग्रेसचा सरकारविरोधात एल्गार

### राजाभाऊ ठाकूर यांच्या उपस्थितीत बैठक

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील जनतेच्या ज्वलंत प्रश्नांना राजकीय मुद्याचे स्वरूप देत सत्ताधारी सरकारला घेरण्यासाठी काँग्रेसने आता आक्रमक पवित्रा घेण्याचे संकेत दिले आहेत. मुंबई-गोवा महामार्गावरील जीवघेणे खड्डे, सातत्याने होणारी वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था तसेच विद्यार्थ्यांच्या भवित्यावर परिणाम करणाऱ्या पेपरफुटीच्या प्रश्नावर आगामी काळात आंदोलनाची धार अधिक तीव्र करण्याची रणनीती काँग्रेसने आखली आहे.

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि रोहा



तालुकाध्यक्ष मितेश कल्याणी यांच्या अध्यक्षतेखाली रोहा येथे तालुका पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नुकतीच आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जनतेच्या प्रश्नांवरून सरकारला जाब विचारण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम वर्षानुवर्षे सुरू असतानाही नागरिकांच्या अडचणी कमी झालेल्या नाहीत. उलट खड्डे, वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या रस्ते सुविधांमुळे वाहनचालक, व्यापारी, विद्यार्थी तसेच दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सरकारकडून वारंवार आश्वासने दिली जात असली तरी प्रत्यक्ष परिस्थितीत बदल किती झाला, असा सवाल काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी उपस्थित करण्यात आला. जनतेच्या या प्रश्नांना केवळ निवेदनापुरते मर्यादित न ठेवता गरज पडल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची भूमिका बैठकीत व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित पेपरफुटीच्या घटनांवरही बैठकीत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. वर्षभर अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांमुळे पाणी फेरले जात असेल, तर ही गंभीर बाब आहे. परीक्षा प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी काँग्रेसने केली. तसेच महागाई, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि प्रशासनाच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजी असल्याचा दावा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. त्यामुळे ही नाराजी संघटित करून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, तालुकाध्यक्ष मितेश कल्याणी, श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष विलास सुर्वे, उपाध्यक्ष अशपाक पानसरे, सरचिटणीस सुनील देशमुख, खजिनदार रामप्रकाश कुशवाह, अल्पसंख्याक अध्यक्ष बिलाल कुरेशी, तालुका कार्यकारी अध्यक्ष फैजल अधिकारी, आदिल पानसरे, विनोद सावंत, अशोक कांबळे, बशीर भुरे, हरिओम टाळकुटे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नागाव समुद्रकिनारा झाला चकाचक | विविध प्रकारच्या कचऱ्याचे संकलन

## 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर' अभियान

| रेवदंडा | प्रतिनिधी |

जागतिक ओझोन दिनानिमित्त आयआयटीएम पुणे आणि नागाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर ५.०' या उपक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्रकिनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी दीड दिवसांच्या गणपती विसर्जनानंतर समुद्रकिनारी जमा झालेला विविध प्रकारचा कचरा स्वयंसेवकांनी गोळा करून किनारा स्वच्छ केला. मोठ्या प्रमाणात कचरा संकलित करण्यात आल्याने समुद्रकिनाऱ्याच्या





स्वच्छतेबरोबरच कचरा व्यवस्थापनाचे महत्त्वही अधोरेखित झाले.

या अभियानात नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह आयआयटीएम पुणे टीम, ग्रामपंचायत स्वच्छता व कचरा व्यवस्थापन पथक तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी हर्षदा मयेकर यांनी, "स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि जबाबदार नागरिकत्व ही केवळ एखाद्या स्वच्छता अभियानापुरती मर्यादित न राहता दैनंदिन जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे," असे मत व्यक्त केले.

तसेच, किनारपट्टीच्या स्वच्छतेसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या अनुप महाजन व आयआयटीएम पुणे टीमचे आभार मानण्यात आले. प्रत्येक स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व कचरा व्यवस्थापन पथकाचे अभिनंदन करण्यात आले. त्याचबरोबर "वारंवार स्वच्छता अभियान राबविण्याची गरजच भासू नये, अशी सामूहिक जबाबदारीची भावना प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे. नागावचे समुद्रकिनारे सदैव स्वच्छ राहावेत, हेच आपले सामूहिक स्वप्न असावे," असा संदेश देखील यावेळी देण्यात आला. या उपक्रमामुळे समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला.

## 'सेवा संकल्प'मधून योजनांचा जागर

| पेण | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पेण येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाच्यावतीने संकल्प रथ प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासह योजनांची जनजागृती केली जाणार आहे.





पेण येथे झालेल्या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी किशन जावळे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जि.प. कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील, आदिवासी प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, तहसीलदार तानाजी शेजाळ, पंचायत समिती सदस्य कमल पवार, लाभार्थी गुलाब वाघमारे यांच्यासह विविध शासकीय अधिकारी उपस्थित होते. दि.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून सेवा सेतू, सेवा माझे योगदान, विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रा, अंगणवाडी उत्सव, आशीर्वादाचा दिवा, बदलाची गोष्ट आणि नमो सेवागाथा यांसारखे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना आर्थिक मदतीचे धनादेश वितरित करण्यात आले. तसेच, या अभियानातून शासनाच्या योजना कागदावर न राहता त्या लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी संकल्प रथाच्या माध्यमातून आदिवासी भागात जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



● माणगाव आदर्श समतानगर येथील रहिवासी तथा सिव्हील कॉन्ट्रॅक्टर नितीन विष्णू बामगुडे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)

## गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● श्री. विकास म्हात्रे (Fresh bake house) यांच्या निवास्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव)



● श्री. गंधर्व सुदाम पाटील, तालुका प्रमुख- महाराष्ट्र वाहतूक सेना, मु. नेहुली-अलिबाग.



● भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री.निलेश थोरे व महिला तालुकाध्यक्षा सौ. रचना थोरे यांच्या निवासस्थानी पुणे मुंबई दृतगती महामार्गावरील मिसींग लिंक देखाव्यासह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख)





आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

सुरेश खडपे (चौल) : ९९२१०५४६०६
जीवन पाटील(भाकरवड) : ७०६६८९८६३७/ ८१४९६६३८१३
संजय गायकवाड (कर्जत) : ९४२३३७७९००
समीर मालोदे (अलिबाग) : ९४२३३७५३६१
मुकुंद रांजणे (माथेरान) : ७५०७६७३८७९
अनिल गवळे (वेणगाव) : ९६८९९५४४२४
नंदकुमार मरोदे (खांब) : ८३०८६८८२२९
सलीम शेख (माणगाव) : ९४२३३८२७८९
सुधीर नाझरे (मुरुड): ९४२३३७७२४२
समीर रिसबुड (श्रीवर्धन): ९८८१९२२८३५
दत्ता म्हात्रे : (चिरनेर) : ७२०८३७७१०५
जुनेद तांबोळी (महाड) : ८४११९२४४६२
शैलेश पालकर (पोलादपूर) :९२२६८४९१८५
कांता हाबळे (नेरळ) : ९२०९२३८७६९
राजू नेवासेकर (मुरुड) : ९९२१६२३८४८/ ८२३७१३८९७४
सुनील ठाकूर (उरण) : ८१०८९२१५६५
मुस्कान खान (पेण) : ८९२८९१११३९१
राकेश खराडे (रसायनी) : ९६६५३१४११५
बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा): ९८६०६०९६५४
भूषण सुतार (सुधागड) : ८१४९६६४०५८
सत्यप्रसाद आढाव (रोहा) : ८९८३४२०१६१
अब्दुल सोगावकर (सोगाव) : ९९६०४८११३३
गणेश चोढणेकर (मुरुड) : ९२६००१६३२३
वैशाली मलबारी (पेण) : ८९८३९३६४५५
अल्ताफ चोरडेकर (रोहा) : ८८०५२४९५६७
सिद्धी दाखिणकर (माणगाव) : ७४९९३११८१७
महेश पवार (नागोठणे) : ९२२५४७००३७

स्पर्धेचे स्वरूप
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. ११.०० ते संध्या. ५.०० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

# खिसे कापण्याचे तत्व

अखेर मोदी सरकारने यूपीआय पेमेंटवर शुल्क लागू केले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये असे शुल्क लागू करण्याला परवानगी देणारे एक विधेयक केंद्र सरकारने संमत केले होते. तेव्हाच मोदी सरकारचे इरादे काय हे दिसले होते. आता त्याचा तपशील जाहीर झाला आहे. त्यानुसार दोन हजार रुपयांवरच्या पेमेंटला ०.४ टक्के शुल्क आकारले जाणार आहे. म्हणजेच शंभर रुपयांना चाळीस पैसे किंवा एक हजार रुपयांना चार रुपये. रोजच्या व्यवहारातल्या रकमा चुकत्या करण्याला याचा फटका बसणार नाही असा सरकारचा दावा आहे. तो काही अंशी खरा आहे. रिक्षाचे २५ किंवा ५० रुपयांचे भाडे, किराणा मालाची किंवा भाजीची दोन-चारशे रुपयांची खरेदी इत्यादींमध्ये सध्या लोक जीपे, फोनपे किंवा तत्सम मार्गाने मोबाईलवरून पेमेंट करीत असतात. त्यांना या शुल्काचा फटका बसणार नाही. मात्र टीव्ही, फ्रीज, फर्निचर किंवा तशा प्रकारच्या मोठ्या खरेदीचे पेमेंट जर या मार्गाने केले तर मात्र त्यांना शुल्क द्यावे लागेल. कारण ही पेमेंट्स बहुदा दोन हजार रुपयांवरच्या गटातील असतील. याखेरीज वीजबिले किंवा पेट्रोल पंपावरचे पेमेंटलाही याचा फटका बसू शकेल. अर्थात तिथेही एकूण पेमेंटच्या मानाने शुल्काच्या रकमा पाच किंवा दहा रुपयांच्या आसपास असल्याने अनेकांना त्या कमी वाटण्याची शक्यता आहे. सरकारचा दावाही तसाच आहे. शिवाय हे शुल्क व्यापाऱ्यांना भरावे लागणार असून त्याचा भार ग्राहकांवर पडणार नाही याची काळजी घेतली जाईल असे सरकार म्हणते. पण हे दोन्ही दावे खोटे आहेत. विशेषतः व्यापारीच कर भरतील हे तर तद्दन खोटे आहे. कोणताही व्यापारी स्वतःच्या खिशातून कधीही कर भरत नसतो हे भारतीय जनतेला चांगले ठाऊक आहे. म्हणजे समजा, आपण पाच हजार रुपयांचे कपाट विकत घेतले तर त्यावरचे हे सोळा रुपयेदेखील व्यापारी देणार नाही. तर तो कपाटाची किंमत मुळातच ५० रुपयांनी वाढवून गिऱ्हाइकांकडून आणखी पैसे काढेल.

### मोदींचे आश्वासन ठरले खोटे

वैयक्तिकरीत्या एका मित्राने दुसऱ्या मित्राला पाठवलेले पैसे वगैरेंवर शुल्क लागू राहणार नाही. छोट्या व्यापाऱ्यांवर शुल्क लागणार नाही याची काळजी बँकांनी घ्यावी असे आदेश दिले गेले आहेत वगैरे गोष्टी सांगून सरकारने दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुळात एक तत्व म्हणून सरकार अशा व्यवहारांवर शुल्क लागू करू शकणार आहे हा यातला आक्षेपाचा खरा मुद्दा आहे. नोटा छापणे व त्या वितरित करणे हे रिझर्व्ह बँकेचे म्हणजे सरकारचे काम आहे. ती सुविधा नाही तर अत्यावश्यक सेवा आहे. कारण या नोटांमुळेच देशातील आर्थिक व्यवहार सुरळीत होत असतात व अर्थव्यवस्था चालत असते. यूपीआय हा या नोटांच्या व्यवहारांना पर्याय आहे. त्यातून सरकारचा नोटा छापण्याचा खर्च कमी होत असतो. अब्जावधी रुपयांच्या नोटा हाताळणे, त्यांचा साठा बँकांमध्ये करून ठेवणे याला जागा व पैसे लागतात. यूपीआयमुळे त्याची बचत होत असते. शिवाय बनावट नोटांच्या धोक्याला यामुळे अटकाव केला जात असतो. यूपीआयमध्येही फसवणूक होते. पण ती वैयक्तिक खातेदाराची होते. काळजी घेतली तर ती रोखता येते. बनावट नोटांमुळे सार्वत्रिक जनतेची जी फसवणूक होते तशी यूपीआयमध्ये होत नसते. शिवाय यूपीआयमुळेच अर्थव्यवहारांची व्याप्ती प्रचंड वाढते. उदाहरणार्थ समजा मुंबईत बसून गोव्याचे काजू मागवायचे असतील तर पूर्वी त्यांचे पैसे देण्यामध्ये सोपेपणा नव्हता. चेक देणे किंवा मनीऑर्डरने पैसे पोचवणे हे त्रासाचे आणि वेळखाऊ होते. त्यात फसवाफसवीची शक्यताही खूप असे. आता मात्र एका क्षणात हे पेमेंट करता येते. याचमुळे घरपोच वस्तू पोचवण्याच्या सेवांना बहर आला व त्यातून एकूण व्यापारउद्योग शतपटींनी वाढला. याच कारणास्तव यूपीआयचा अधिकाधिक वापर करा असे आवाहन खुद्द पंतप्रधान करीत होते व ही सेवा मोफत आहे असे आवर्जून सांगत होते. पण आता मोदींच्या इतर आश्वासनांप्रमाणेच हेही आश्वासन खोटे ठरले. पण खरा धोका असा आहे की जी गोष्ट अत्यावश्यक सेवा म्हणून नागरिकांना मोफत द्यायला हवी तिच्यावर शुल्क लावण्याचे तत्व सरकार यातून जनतेच्या गळी उतरवू पाहत आहे.

### या अळीचा पुढे तक्षक होईल

रेल्वेची तिकिटे ऑनलाईन पध्दतीने काढण्याची सोय झाली तेव्हा ती जवळपास मोफत होती. तिकिट रद्द केले तरीही शुल्क घेतले जात नसे. आता मात्र या दोन्हींवरही भरमसाठ पैसे घेतले जातात. तिकिट रद्द केले तर अनेकदा जवळपास ५० टक्के पैसे वाया जातात. वास्तविक तिकिट देणे किंवा रद्द करणे ही रेल्वेच्या व्यवहारांचा भाग आहे. ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी रेल्वेला सर्व्हर्स किंवा संगणकांची प्रचंड यंत्रणा उभारावी लागत असली तरी तिच्या इतर खर्चांची बचत होत असते. अन्यथा तिला त्या प्रमाणात तिकिटांच्या खिडक्या व कर्मचारी वाढवावे लागले असते. दुसरे म्हणजे ऑनलाईन व्यवहारांमुळे रेल्वे प्रवासी वाढले आहेत. तरीही सरकारने यातल्या खर्चाचा भार जनतेवरच टाकला. रेल्वे प्रवासाला पर्याय नसल्याने व तो स्वस्त असल्याने लोकांनी नाईलाजाने हा खर्च मान्य केला. सध्या घरगुती गॅस सिलेंडरचे बुकिंग तुम्ही फोनवरून करू शकता. उद्या रेल्वेप्रमाणेच यावरही शुल्क लागू केले जाऊ शकते. आरोग्य, शिक्षण, पाणी, रस्ते, लाईट्स या सर्व मूलभूत सुविधा आहेत. सरकारने त्या मोफत किंवा अत्यंत कमी किमतीत पुरवायला हव्यात. त्यासाठीच सरकार कर गोळा करीत असते. पण ते विसरून आता या प्रत्येक गोष्टीतून नफा मिळाला पाहिजे असा अट्टाहास सुरू झाला आहे. खासगी क्षेत्रातले लोक याबाबत सरकारला भरीला घालत असतात. महापालिका किंवा सरकारच्या खर्चाचा विचार आला की, सत्तर टक्के खर्च कर्मचाऱ्यांवर होतो म्हणून नाके मुरडली जातात. पण टीसीएससारख्या सॉफ्टवेअर कंपनीतही माणसांवरच पैसे खर्च होत असतात व ते अनिवार्य आहे. कारण, शेवटी सेवा माणसेच पुरवत असतात वा तेच सॉफ्टवेअर तयार करीत असतात. पण सरकारने प्रत्येक कामात फायदा कमवायला हवा हे तत्व प्रस्थापित केले गेले आहे. हेच तत्व यूपीआयमध्ये दाखल झाले आहे. आज शंभराला चाळीस पैसे ही रक्कम छोटी वाटत असली तरी हळूहळू ती वाढत जाणार आहे. जीएसटी नावाच्या एका तक्षकाचा प्रवेश असाच अळीच्या रुपाने इथे झाला होता. आज अगदी गरिबातल्या गरिबालाही त्याचा फटका बसत असतो. यूपीआयच्या शुल्काचाही नंतर असाच विस्तार होणार आहे. उद्या दहा रुपयांचे पेमेंट केले तर त्याच्यावरही शुल्क आकारण्याचा मार्ग सरकारने तयार केला आहे. ही यंत्रणा चालवण्यासाठी सरकारला २० हजार कोटींचा खर्च येतो असे सांगतात. पण जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि रिझर्व्ह बँकेकडून चार लाख कोटी रुपयांचा लाभांश मिळवणाऱ्या सरकारसाठी ही रक्कम खूप छोटी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सरकार जनतेला यूपीआयमध्ये कोणतीही वेगळी सुविधा देत नसून हा अत्यावश्यक सेवेचाच भाग आहे. सबब या शुल्काला विरोध करणे आवश्यक आहे.

विचार

# पायाच्या जादूगाराची निवृत्ती

*मेस्सीची जीवनगाथा मानवी अस्तित्व आणि संघर्षाच्या मूलभूत तत्त्वांवर प्रकाश टाकते. यात केवळ अविश्वसनीय विजय आणि गोलचे विक्रम नाहीत, तर टोकाचे नैराश्य आणि स्वतःच्याच लोकांकडून झालेली टीकाही आहे. एक महान खेळाडू देशाला केवळ विजय मिळवून देत नाही, तर अपयशातून उभे राहायची जीवनदृष्टी देतो, हे त्यातून दिसते. जगप्रसिद्ध फुटबॉलपटू मेस्सीच्या निवृत्तीच्या निमित्ताने घेतलेला वेध.*

**महेश जोशी**

जागतिक क्रीडाविश्वाच्या इतिहासात काही खेळाडूंचे निवृत्तीचे क्षण हे केवळ एका खेळाडूच्या मैदानाबाहेर पडण्याची साधी बातमी नसतात, तर एका संपूर्ण युगाच्या समाप्तीची आणि मानवी जिद्दीच्या एका भव्य अध्यायाच्या पूर्णत्वाची जाणीव करून देणारे क्षण असतात. अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याने आंतरराष्ट्रीय फुटबॉलच्या पटलावरून घेतलेली अंतिम एक्झिट ही क्रीडा इतिहासातील अशीच एक अतिशय भावुक आणि ऐतिहासिक घटना ठरली आहे. एका दशकाच्या कालावधीत मेस्सीने आपल्या लाडक्या देशाची निळी-पांढरी जर्सी कायमची बाजूला ठेवण्याचा निर्णय दोनदा घेतला; मात्र या दोन निवृत्तींमधील अंतर हे केवळ दहा वर्षांच्या काळाचे नव्हते, तर एका पराभूत, खचलेल्या आत्म्यापासून सर्वस्व जिंकून शांतपणे पायउतार होणाऱ्या एका अजरामर दंतकथेपर्यंतच्या प्रवासाचे होते. दोन्ही वेळेस भावना, डोळ्यांतील अश्रू आणि पार्श्वभूमी पूर्णपणे भिन्न होती. २०१६ च्या त्या मध्यरात्री मैदानात उभा असलेला मेस्सी हा लागोपाठच्या पराभवांनी आतून पूर्णपणे तुटलेला, आत्मविश्वासाला तडे गेलेला आणि स्वतःच्याच देशाच्या अपेक्षेच्या ओझ्याखाली दबलेला एक दुःखी खेळाडू होता. उलटपक्षी, दुसऱ्या निवृत्तीच्या वेळी मैदानात उभा असलेला मेस्सी हा आपल्या देशाचे प्रत्येक स्वप्न सत्यात उतरवून, इतिहासाच्या सुवर्णपानांवर आपले नाव कायमचे कोरून, समाधानाने निरोप घेणारा एक परिपूर्ण सम्राट होता. या प्रवासाचा आरंभ समजून घेण्यासाठी आपल्याला २०१६ च्या त्या काळ्या रात्रीकडे मागे वळून पहावे लागते.

अमेरिकेतील न्यू जर्सी येथील मेटलाइ स्टेडियमवर खेळवला गेलेला कोपा अमेरिका शतकोत्सवी स्पर्धेचा अंतिम सामना मेस्सीच्या कारकिर्दीतील सर्वात अंधकारमय वळण ठरला होता. चिलीविरुद्धच्या त्या अंतिम सामन्यात पूर्ण वेळेत आणि अतिरिक्त वेळेतही कोणताही संघ गोल करू शकला नाही. शेवटी सामना पेनल्टी शूटआउटवर गेला. संपूर्ण जगाच्या नजरा मेस्सीवर खिळल्या होत्या. अर्जेंटिनाचा तो सर्वोत्तम खेळाडू, ज्याच्या पायात चेंडूची जादू होती, तो पेनल्टी घेण्यासाठी पुढे सरसावला; मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. मेस्सीचा तो फटका गोलपोस्टच्या वरून हवेत निघून गेला. चिलीने पुन्हा एकदा विजेतेपद पटकावले आणि अर्जेंटिनाच्या गळ्यात पुन्हा एकदा उपविजेतेपदाची माळ पडली. मेस्सीसाठी हा केवळ एका सामन्याचा पराभव नव्हता. २०१४ च्या फिफा विश्वचषकाचा अंतिम सामना, २०१५ चा कोपा अमेरिका अंतिम सामना आणि आता २०१६ चा हा पराभव, सलग तीन वर्षांमध्ये तीन मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या अंतिम फेरीत पोहोचूनही ट्रॉफीपासून केवळ एका पावलाच्या अंतरावर अपयशी ठरणे हा असा आघात होता, जो मेस्सीच्या सहनशीलतेच्या पलीकडचा होता. त्या रात्री मैदानात गुडघ्यांवर बसून अश्रू ढाळणारा मेस्सी जगभरातील क्रीडाप्रेमींच्या काळजाला घर पाडून गेला. तो केवळ सामना हरला नव्हता, तर स्वतःवरील विश्वास गमावून बसला होता. सामन्यानंतर पत्रकार परिषदेत अतिशय जड अंतःकरणाने आणि थरथरत्या आवाजात त्याने आंतरराष्ट्रीय टबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली.

'राष्ट्रीय संघ माझ्यासाठी आता संपला आहे, मी सलग चार फायनल्स खेळलो आणि एकदाही जिंकू शकलो नाही, मी माझे सर्वस्व पणाला लावले; पण कदाचित माझ्या नशिबात हे लिहिलेलेच नाही,' हे उद्गार एका २९ वर्षांच्या तरुणाचे नव्हते, तर सततच्या टीकेने, देशांतर्गत होत असलेल्या अपमानाने आणि स्वतःच्याच अपेक्षांच्या ओझ्याखाली दबून गेलेल्या एका पराभूत राजाचे आक्रंदन होते. या ऐतिहासिक पराभवानंतर संपूर्ण फुटबॉल जगतात प्रचंड खळबळ उडाली. मेस्सीवर कठोर टीका करणाऱ्यांपासून पाठीशी उभे राहणाऱ्यांपर्यंत अनेकांचे सूर उमटले; पण या संपूर्ण नाट्यात सर्वात अनपेक्षित आणि मनाला भिडणारा आवाज आला तो त्याचा मैदानातील कट्टर प्रतिस्पर्धी ख्रिस्तियानो रोनाल्डोकडून. ज्या दोन खेळाडूंमध्ये दशकानुशतके जगातील सर्वोत्तम फुटबॉलपटू बनण्याची तीव्र स्पर्धा चालली होती, त्याच रोनाल्डोने या कठीण प्रसंगी आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या मनातील वेदना अचूक ओळखली. रोनाल्डोने जाहीरपणे मेस्सीच्या निर्णयाचा आदर करत बचाव केला. मेस्सी हा पराभवांची आणि अपयशांची सवय असलेला खेळाडू नाही, दुसऱ्या स्थानावर समाधान मानणे त्याच्या रक्तात नाही, एका पेनल्टी चुकण्याने कोणी वाईट खेळाडू ठरत नाही, असे म्हणत रोनाल्डोने मेस्सीच्या महानतेला सलाम केला होता. इतकेच नव्हे, तर मेस्सीला अशा प्रकारे रडताना पाहणे अत्यंत वेदनादायी असून त्याने आपल्या देशासाठी पुन्हा मैदानात परतायला हवे. कारण अर्जेंटिनाला आणि संपूर्ण टबॉल जगताला त्याची गरज आहे, अशी भावनिक सादही रोनाल्डोने घातली होती.

खेळभावनेपलीकडे जाणारे दोन दिग्गजांमधील परस्परआदराचे हे एक दुर्मिळ आणि देखणे उदाहरण ठरले. सुदैवाने मेस्सी फार काळ आपल्या देशाच्या जर्सीपासून लांब राहू शकला नाही. अर्जेंटिनाच्या जनतेने, जगभरातील चाहत्यांनी आणि तत्कालीन व्यवस्थापनाने केलेली आर्त विनवणी त्याच्या मनाला स्पर्शून गेली आणि त्याच वर्षाच्या अखेरीस त्याने आपला निर्णय मागे घेत राष्ट्रीय संघात पुनरागमन केले; पण ही केवळ साधी खेळाडू म्हणून वापसी नव्हती, हा एका महाकाव्याच्या दुसऱ्या आणि सर्वात देदीप्यमान पर्वाचा आरंभ होता. सुरुवातीची काही वर्षे पुन्हा संघबांधणीत आणि संघर्षात गेली; पण २०१९ नंतर अर्जेंटिनाच्या संघात एक वेगळाच प्राण फुंकला गेला. मेस्सीच्या नेतृत्वाखाली एक असा तरुण आणि लढाऊ संघ उभा राहिला, जो आपल्या कर्णधारासाठी मैदानात स्वतःचे रक्त आटवायला तयार होता. या महापरिवर्तनाचा पहिला मोठा साक्षात्कार घडला २०२१ मध्ये. ब्राझीलच्या ऐतिहासिक आणि अभेद्य मानल्या जाणाऱ्या माराकाना स्टेडियमवर पार पडलेल्या कोपा अमेरिका स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाने यजमान ब्राझीलचा पराभव केला. तब्बल २८ वर्षांनंतर अर्जेंटिनाने मोठी आंतरराष्ट्रीय ट्रॉफी उंचावली आणि मेस्सीच्या कारकिर्दीवरील राष्ट्रीय ट्रॉफी न जिंकण्याचा कलंक कायमचा पुसला गेला. अंतिम शिट्टी वाजताच मेस्सी मैदानात कोसळून रडू लागला; पण या वेळी ते अश्रू दुःखाचे नव्हते, तर तब्बल दीड दशकाच्या प्रतीक्षेनंतर मिळालेल्या मुक्तीचे होते, तरीही मेस्सीची कथा अजून अपूर्ण होती, कारण एक शिखर अजूनही बाकी होते, ज्याचे स्वप्न प्रत्येक फुटबॉलपटू लहानपणापासून पाहत असतो. ते अंतिम शिखर गाठले गेले २०२२ च्या अखेरीस कतारच्या वाळवंटात.

कतार विश्वचषक ही मेस्सीच्या कारकिर्दीची अंतिम परीक्षा होती. पहिल्याच सामन्यात सौदी अरेबियाकडून झालेला अनपेक्षित पराभव, त्यानंतर प्रत्येक सामन्यात निर्माण झालेली 'करा अथवा मरा' अशी परिस्थिती आणि अशा प्रचंड दबावाखाली मेस्सीने दाखवलेले अद्वितीय नेतृत्व हे फुटबॉल इतिहासातील सर्वात रोमांचक प्रकरण ठरले. लुसैल स्टेडियमवर फ्रान्सविरुद्ध खेळवला गेलेला तो अंतिम सामना हा केवळ फुटबॉल इतिहासातीलच नव्हे, तर अवघ्या क्रीडाविश्वातील आजवरचा सर्वात थरारक सामना ठरला. अतिरिक्त वेळेत ३-३ अशी बरोबरी झाल्यानंतर सामना पेनल्टी शूटआउटमध्ये गेला. ज्या पेनल्टी शूटआउटने २०१६ मध्ये मेस्सीचे हृदय तोडले होते, त्याच पेनल्टी शूटआउटने २०२२ मध्ये त्याला अमरत्वाचा मुकुट घातला. फ्रान्सला नमवून अर्जेंटिनाने विश्वचषक जिंकला आणि मेस्सीने ती सोनेरी ट्रॉफी आपल्या हातात घेऊन छातीशी कवटाळली. २०१६ मध्ये ज्या खेळाडूने हात टेकले होते, त्याच खेळाडूने सहा वर्षांनंतर जगातील सर्वात मोठी ट्रॉफी आपल्या देशाला मिळवून दिली. यानंतर २०२४ मध्ये सलग दुसऱ्यांदा कोपा अमेरिका जिंकून अर्जेंटिनाने आपले जागतिक वर्चस्व पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध केले. कालांतराने वयाची आणि शरीराची मर्यादा प्रत्येकालाच गाठत असते. २०२६ च्या विश्वचषकापर्यंत पोहोचताना मेस्सीने आपल्या कारकिर्दीच्या उत्तरार्धातील शेवटचे पाऊल टाकले होते. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत स्पेनविरुद्धच्या अतिशय चुरशीच्या आणि अतिरिक्त वेळेपर्यंत ताणल्या गेलेल्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाला निसटता पराभव पत्करावा लागला. हाच सामना मेस्सीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा अखेरचा अध्याय ठरला. या अंतिम सामन्यानंतर जेव्हा मेस्सीने आंतरराष्ट्रीय फुटबॉलला कायमचा रामराम ठोकण्याचा निर्णय जाहीर केला, तेव्हा पुन्हा एकदा जग स्तब्ध झाले; परंतु या वेळी परिस्थिती आणि वातावरण २०१६ च्या तुलनेत पूर्णपणे विपरीत होते. या दुसऱ्या निरोपाच्या वेळी मेस्सीच्या डोळ्यात कोणताही पश्चात्ताप नव्हता, कोणताही न्यूनगंड नव्हता किंवा अपूर्णतेची भावना नव्हती. त्याच्या चेहऱ्यावर एका प्रदीर्घ, खडतर आणि अखेर विजयी ठरलेल्या महाप्रवासाची शांतता आणि तृप्ती झळकत होती. या निरोपाला एक अतिशय हळवी कौटुंबिक किनारही लाभली होती. मेस्सीचे वडील आणि त्याची कारकीर्द घडवण्यात आयुष्यभर सावलीसारखे पाठीशी उभे राहिलेले त्याचे मार्गदर्शक जॉर्ज मेस्सी यांचे नुकतेच झालेले निधन या काळात घडले होते. पित्याला गमावल्यानंतर मेस्सीने आंतरराष्ट्रीय मंचावरून पायउतार होण्याचा अत्यंत कठीण पण विचारपूर्वक निर्णय घेतला. आपल्या अंतिम निरोप संदेशात त्याने व्यक्त केलेल्या भावना प्रत्येक फुटबॉल रसिकाच्या डोळ्यांमध्ये पाणी आणणाऱ्या होत्या. हा निर्णय माझ्या आत्म्याला वेदना देणारा आहे; पण मला जाणीव आहे की आता योग्य वेळ आली आहे, असे त्याने लिहिले. मी देशाला केवळ यश मिळवून दिलेल्या वर्षांमध्येच नव्हे, तर त्याआधीच्या संघर्षाच्या काळातही माझे सर्वस्व अर्पण केले आहे, मी स्वतःला देशासाठी पूर्णपणे झोकून दिले आणि आता माझ्याकडे देण्यासारखे काहीही शिल्लक राहिलेले नाही, अशी प्रांजळ कबुली त्याने यावेळी दिली.

चर्चा आजची

# खरी संस्कृती जपण्याची गरज

**सुयोग आंग्रे**

प्रदीर्घ काळानंतर, गेल्या काही दशकांत हिंदू आपले सण विना अडथळा, आनंदाने आणि आनंदाने साजरे करत आहेत, पण काही लोकांसाठी हे सण कोलाहल आणि कोलाहलाचे निमित्त बनले आहेत हे नाकारता येणार नाही. काही सणांमध्ये अशी दृश्ये सर्रास दिसतात, जिथे मिरवणुका तासनतास रस्ते अडवतात, मोठ्या आवाजात संगीत, अश्लील गाणी आणि नृत्ये, ये-जा करणाऱ्यांशी गैरवर्तन हे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्नच बनत नाहीत तर या सणांचेपावित्र्यही भंग पावतात. या कार्यक्रमांमध्ये कलात्मकतेचा अभावही दिसून येतो. पारंपरिक कलेचा जागर म्हणून संस्कृतीचा आधार घेतला जातो परंतु त्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन कितपत असतो हा संशोधनाचा भाग आहे. ग्रामीण भागांपेक्षाशहरांमध्ये हिंदू जीवन उच्च संस्कृतीच्या उदयाची वाट पाहत आहे.असे म्हटले तर वावगे ठरू नये. सार्वजनिक सणांमध्येही या नव्या उच्च संस्कृतीचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. उच्च संस्कृतीचा अर्थ अशी संस्कृती नाही जी केवळ संग्रहालये, सभागृहे किंवा समाजातील एका छोट्या वर्गापुरती मर्यादित आहे. उच्च संस्कृती म्हणजे ज्याची अभिव्यक्ती पौराणिक कथा, सभ्यता प्रतीके आणि तत्त्वज्ञानाचे सार सौंदर्याच्या भावनेने सन्मानित स्वरूपात प्रकट करते. एक संस्कृती जी अर्थपूर्ण आणि सभ्य आहे, जी स्वारस्य सुधारते, भावना जागृत करते, लक्ष आणि संवेदनशीलता विकसित करते आणि समाजाला स्वतःबद्दल एक सन्माननीय दृष्टीकोन देते. असे नाही की लोकप्रिय संस्कृतीच अश्लील आहे आणि केवळ उच्चभ्रू संस्कृती श्रेष्ठ आहे. महाराष्ट्रात शास्त्रीय संगीत ते सुरेल भजन किंवा महाराष्ट्रातील पारंपरिक नृत्य ते जाखडी किंवा धावरे नाच या सर्व भावपूर्ण आणि प्रतिष्ठित कला आहेत.परंतु हे खरे आहे की सर्व लोकनृत्य आणि संगीत एकतर लोप पावत आहेत किंवा त्यांच्यातील वाढत्या अश्लीलतेमुळे त्यांचे मूळ स्वरूप नष्ट होत आहे. ही परिस्थिती दुःखद आहे, कारण उच्च संस्कृती केवळ इंद्रियांनाच उत्तेजित करत नाही तर त्यांना शिस्तबद्ध आणि वरच्या दिशेने परमोच्च बिंदू बनवते. हिंदू संस्कृतीच्या संदर्भात हे अधिक महत्त्वाचे आहे, कारण हिंदू सौंदर्यशास्त्र केवळ वस्तू सुंदर बनवण्यापुरते मर्यादित नव्हते. हिंदू विचारात रस ही संकल्पना आहे, जी सामान्य भावनांचे कलात्मक अनुभवात रूपांतर करते. भारतीय कलेच्या या वैशिष्ट्यावर भर देऊन, संस्कृती आणि कलेचे प्रणेते, आनंद केंटिश कुमारस्वामी यांनी लिहिले आहे की भारतीय कलेचा उद्देश केवळ मूर्त वस्तूंचे चांगले अनुकरण करणे नाही तर त्याद्वारे उच्च आदर्श आणि खोल सत्य प्रकट कणे आहे. त्यांच्या मते, कलाकारासाठी दृश्य सौंदर्य हे शाश्वत प्रकट करण्यासाठी एक शिस्तबद्ध माध्यम आहे. अनेक महान कलाकारांनी आणि पारंपरिक संस्कृतीतून संगीत कला टिकविणाऱ्यागुरूंनी कलेच्या ऱ्हासाबद्दल चेतावणी दिली की, जर शिस्त हरवली तर कला 'क्षुल्लक, दिखाऊ, कामुक, स्वस्त आणि अश्लील' होऊ शकते. त्याच्यासाठी, सर्वोत्तम कलेमध्ये बुद्धी, भावना आणि चारित्र्य उंचावण्याची शक्ती होती. तज्ज्ञांच्या मते, समाजाचे सौंदर्यशास्त्र ही केवळ चवीची बाब नसते, तर ती हळूहळू त्या समाजाचे चरित्र बनते. काही धार्मिक उत्सवांमध्ये अश्लील नृत्य आणि गाण्याच्या घटना संस्कृती रसातळाला जात आहेत असा इशारा देत त्याची पूर्तता करतात. सणांचे स्वरूप किती सुंदर असू शकते याचे सुंदर उदाहरण अनेक ठिकाणी जन्माष्टमी उत्सवात पाहायला मिळाले. या उत्सवात, फुलांची व्यवस्था, दिव्यांची रोषणाई, कृष्ण गोपिका नृत्य, मिरवणूक, भक्ती संगीत आणि पारंपारिक वाद्यवृंद यांनी एकत्रितपणे एक जादू निर्माण केली जी उत्सव, भक्ती आणि सौंदर्य यांचे अद्भुत मिश्रण होते. या पारंपारिक घटकांच्या समायोजनामुळे गणपती मिरवणुकीत अभंग, शास्त्रीय आणि लोकसंगीत, सुव्यवस्थित ऑर्केस्ट्रा, अस्सल हिंदू प्रतीकांवर आधारित ध्वज आणि सजावट आणि पौराणिक कथांवर आधारित नाट्य सादरीकरण शक्य आहे. जन्माष्टमीमध्ये नृत्य, कीर्तन, कविता, नाटक, चित्रकला, कथाकथन आणि कलात्मक प्रकाश सजावट होऊ शकते. कानाला आनंद देणारे संगीत, नृत्य, साहित्य, वेशभूषा आणि देवी-परंपरेचा अर्थ नुसत्या कानाला फाटा देणारे संगीत न समजता नवरात्री हा नऊ दिवसांचा सांस्कृतिक उत्सवही होऊ शकतो. प्रश्न असा आहे की या बदलाचे नेतृत्व कोणी करायचे? त्याची जबाबदारी सरकारवर टाकता येत नाही किंवा स्वतःहून नवीन संस्कृती जन्माला येईल अशी अपेक्षाही करता येत नाही. त्यासाठी मंदिरे, धार्मिक संस्था, सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, कलावंत आणि जागरूक सामाजिक नेतृत्व यांना पुढे यावे लागेल. मोठे मंदिर ट्रस्ट आणि धार्मिक संस्था विशेष महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, कारण त्यांच्याकडे संसाधने आणि प्रभाव दोन्ही आहेत. ते संगीत, नृत्य, नाटक, चित्रकला, उत्सव सजावट आणि मिरवणुकांमध्ये नवनिर्मितीला प्रोत्साहन देऊ शकतात. सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था आवश्यक सुविधा देऊ शकतात, पण विधायक नेतृत्व समाजातून यावे लागेल. श्रीमंत भक्त आणि सांस्कृतिक न्यास देखील त्यांचा पैसा केवळ मोठमोठे पँडल आणि कान-विभाजित संगीतावर खर्च करण्यापेक्षा कलाकारांना आणि नवीन सांस्कृतिक निर्मितीला संरक्षण देण्यासाठी गुंतवू शकतात. हिंदू सणांचे गंभीर शास्त्रीय संगीत उत्सवात रूपांतर करणे किंवा त्यांना विनोद, रंग, खेळ आणि साधी भक्ती यापासून वंचित ठेवण्याचा हेतू नाही. त्यांना अधिक सुंदर, कल्पक आणि सौम्य बनवण्याचा हेतू असावा. सभ्यतेचे गांभीर्य तेव्हा दिसून येते जेव्हा ती ज्या प्रकारांमधून स्वतःला अभिव्यक्त करते ते गंभीरपणे घेऊ लागते. हिंदू उच्च संस्कृतीच्या पुनर्रचनेत लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

लोकसंसद

### दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त अनंत नाग यांचे अभिनंदन!

भारतीय चित्रपटसृष्टीत अतुलनीय आणि संस्मरणीय योगदानासाठी देण्यात येणारा सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कार यंदा कन्नड चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग (अनंत नागरकट्टे) यांना जाहीर झाला आहे. ४ सप्टेंबर १९४८ रोजी कर्नाटक राज्यातील 'शिराली' येथे एका कोकणी कुटुंबात जन्म झालेल्या अनंत नाग यांनी पाच दशकांहून अधिक काळ आपल्या सहजसुंदर आणि कसदार अभिनयाने भारतीय चित्रपटसृष्टीवर विशेषतः कन्नड आणि हिंदी सिनेमावर एक अढळ ठसा उमटवला आहे. १९७३ मध्ये कन्नड चित्रपट 'संकल्प'मधून नाग यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर अंकुर, निशांत, मंथन, भूमिका, कोंडुरा, कलयुग अशा ३०० हून अधिक विविध भाषांमधील चित्रपटांमधील त्यांच्या अनेक भूमिका अविस्मरणीय ठरल्या आहेत. 'हंसगीते', 'बयालु दारी', 'ना निन्ना बिदलारे', 'चंदनदा गोम्बे' आणि 'मिंचिना ओटा' हे त्यांचे गाजलेले कन्नड चित्रपट आहेत. सहा साऊथ फिल्मफेअर पुरस्कार आणि पाच कर्नाटक राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त अनंत नाग यांना २०२५ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले आणि आता २०२४ च्या ५६ व्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी त्यांची निवड झाल्यामुळे अनंत नाग यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त अनंत नाग यांचे हार्दिक अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आली गौराई सोनपावलांनी

गौरीपूजन हा महाराष्ट्रातील एक प्रमुख सण आहे, ज्याला महालक्ष्मीपूजन असेही म्हणतात. हा सण भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर गौरीच्या आगमनाने सुरू होतो. गौरी आणि गणपती जेव्हा एकाच वेळी घरात असतात तेंव्हा तो आनंद आगळावेगळाच. गौरीच्या आगमनाचे, पूजेचे, विसर्जनाचे असे तीनही दिवस धर्मशास्त्राने निश्चित करुन दिलेले असल्यामुळे गौरी मात्र ठरलेल्या दिवशी येतात आणि ठरलेल्याच दिवशी जातात. आज येते, उद्याचा दिवस राहते आणि तिसऱ्या दिवशी विसर्जनासाठी निघते.



गौरी ही निसर्ग देवता असून तिचे वास्तव्य निसर्गातील पाण्याच्या नैसर्गिक स्रोतांजवळ असते असे मानतात. गौरीपूजन हा प्रामुख्याने स्त्रियांचा सण आहे. कोकणातील स्त्रिया गौरीपूजनासाठी खूप तयारी करतात. गौरी आगमनादिवशी सुवासिनी स्त्रिया व कुमारिका पारंपारिक व पीढीजात ठरलेल्या पाणवठ्यावर जातात. नदी, विहीर किंवा गावातील तळ्याकाठी गौरी आवाहन पूजा करण्याची पारंपारिक प्रथा आहे. गौरी आणण्यासाठी जाताना गावातल्याच पारंपारिक कारागिरांनी बांबूपासून बनवलेल्या रोवळीत हळद, तेरडा, आघाडा, यांचे एकेक रोपटे घेतात. या रोपट्यांनाच गौरीचे प्रतिक मानतात.

गौरी आगमनाच्या दुसऱ्या दिवशी पारंपारिक गौरीपूजन सोहळा साजरा होतो. गौरीपूजनादिवशी सकाळपासून गौरीपूजनाची तयारी सुरु होते. गौरीचा मुखवटा, हात, तिरडे, बांबू दागदागिने, कपडे घालून गौरीला अतिशय आकर्षक रुपात सजविण्याची पद्धत आहे. सजवलेल्या गौराईला गणपतीच्या उजव्या बाजूस उभी करुन तिच्या साडीचा पदर गणपतीच्या डोक्यात ठेवतात. त्यानंतर गौरीपूजनास विधिवत सुरुवात होते. गौरीसमोर दिवाबत्ती लावतात. रानफुले व रानफळे वापरून गौरीजवळ सजावट व आरास करतात.

दुपारी गौराईची विधिवत पूजा आटोपल्यावर घरातील सर्व सुवासिनी गौराईसमोर ओवसा भरतात. आपल्या धन्याला सुख व ऐश्वर्य लाभावे, निरामय आरोग्य लाभावे, वंश वारसा सुदृढ व्हावा यासाठी पतीच्या नावाने सुवासिनी गौराईसमोर ओवसा भरतात.

ओवश्यासाठी लागणारी सूपे, सूपल्या, रोवळी आता बाजारात विकत मिळतात. ओवश्यात भरण्यासाठी वाण म्हणून परसातल्या भाज्यांची पाने प्रामुख्याने वापरतात. पडवळ, भोपळा, काकडी, करांदा यांसारख्या भाज्यांच्या वेलांची पाने चटईवर मांडून प्रत्येक पानाला खोबरेल तेलाचे एकेक बोट लावतात. नंतर त्या पानाला हळद व कुंकवाचे बोट लावतात. या वाणाच्या प्रत्येक पानात पडवळ, भेंडी, दोडका, करांदा, काकडी यांची एकेक फोड ठेवतात. अशी भरलेली वाणाची पाने ओवशाच्या सूपात व्यवस्थित मांडतात. सूपात मध्यभागी एक नारळ व पानाचा विडा ठेवतात. ओवशाच्या सूपालाही कापसाचा दोरा बांधून व हळद, पिंजर लावून मानवतात.

गौराईपूजनानंतर रात्री गौरी गणपतीसमोर भजन, आरती व बायकांच्या फुगड्या होतात. पारंपारिक फुगडीगीते गातानाच फुगडीनृत्य करून प्रत्येक घरातील स्त्रिया रात्रभर जागरण करून गौराईपूजनाचा हा संपूर्ण दिवसभराचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करतात. दुसऱ्या दिवशी गोरी गणपतीला गोडधोड नैवेद्य दाखवून व विधिवत पूजा करून गौरी गणपतीचे ठरलेल्या ठिकाणी विसर्जन केले जाते.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१८ सप्टेंबर**

१) श्री.हरिश्चंद्र लक्षमण कोळी वरसोली, अलिबाग, दि.१८-९-१९३०
२) श्री.सुधीर केशव क्षीरसागर वरसोली, अलिबाग, दि.१८-९-१९५०
३) श्री.चंद्रकांत मोरारजी गडा, अलिबाग, दि.१८-९-१९२७
४)श्रीम.मालती मधुकर साळवी अलिबाग दि.१८-९-१९४९
५)श्रीम.सरस्वती गणपत थळे इस्त्राईल-आळी, अलिबाग दि.१८-९-१९४७


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**विमल सॉ मिल उचेडे पेण**


## चिमुकलीवर अत्याचार

**मुंबई :** डोंबिवली येथील रामनगर परीसरात चार वर्षीय चिमुकलीवर ८५ वर्षांच्या इसमाने अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली. पीडित चार वर्षीय मुलगी रामनगर परिसरात आपल्या कुटुंबीयांसह राहते. शेजारी राहणाऱ्या ८५ वर्षीय व्यक्तीने तिच्यासोबत अश्लील वर्तन केल्याचा आरोप आहे. हा प्रकार कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर रामनगर पोलिसांनी संबंधित वयोवृद्ध व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली. प्राथमिक तपासानंतर त्याला अटक करण्यात आली आहे.

## गणपती स्तोत्र स्पर्धा

**अलिबाग :** आदर्श नागरी सहकारी पतसंस्था, अलिबाग यांच्यातर्फे आदर्शमध्ये अनन्या खाते असलेल्या लहान मुलांसाठी गणपती स्तोत्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मुलांचे गणपती बाप्पाचे कोणतेही स्तोत्र किंवा आरती म्हणताना व्हिडिओ रेकॉर्ड करून पाठवण्याचे आवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केले आहे. ५ ते ९ वर्षे व १० ते १३ वर्षे अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आदर्शच्या अनन्या योजनेचा बॉक्स व्हिडिओमध्ये दिसणे आवश्यक आहे. व्हिडिओ पाठविण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी https://participate.syncworks.app/submit.html या लिंकवर व्हिडीओ अपलोड करावा किंवा वॉट्स ऍप क्रमांक ९११२३०६८८८ नंबरवर रील असे टाइप करून पाठवावा.

# प्रतिबंधित प्लास्टिकवर कारवाई

## • महानगरपालिकेकडून नऊ कोटींच्या दंडाची वसुली

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**मुंबई प्लॅस्टिकमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने सुरू ठेवलेल्या मोहिमेत मोठी कारवाई करण्यात आली आहे. पालिकेच्या विविध विभागांनी २३ जून २०१८ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मुंबईतील दुकाने, आस्थापना आणि बाजारांमध्ये तब्बल २९ लाख २८ हजार ७३२ ठिकाणी धाडी टाकल्या. या कारवाईदरम्यान १ लाख २२ हजार ११३ किलोग्रॅम (सुमारे १२२ टन) प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून नियमभंग करणाऱ्यांकडून नऊ कोटी ४० लाख ४० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.**

महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना विभाग, अनुज्ञापन विभाग आणि बाजार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवण्यात आली. या कारवाई अंतर्गत एकूण १८,७६८ प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत. व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी सिंगल यूज आणि प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा, अन्यथा यापुढील काळात कारवाई अधिक तीव्र केली जाईल, असा सक्त इशारा महापालिकेने दिला आहे.



### अन्यथा कारवाई अधिक तीव्र करणार

व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी एकवार वापरल्या जाणाऱ्या (सिंगल यूज) आणि प्रतिबंधित प्लॅस्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा, अन्यथा यापुढील काळात कारवाई अधिक तीव्र केली जाईल, असा सक्त इशारा महापालिकेने दिला आहे.

अनुज्ञापन विभागाने ९ लाख ८५ हजार ६८२ ठिकाणी तपासणी करून १९,५५३ किलोग्रॅम प्लॅस्टिक जप्त करण्यात आले. २,८२० प्रकरणांतून १ कोटी ४१ लाख रुपयांचा दंड वसूल केला. तर बाजार विभागाने ९ लाख ८९ हजार ३१६ बाजारांतील गाळ्यांना भेटी देऊन १,२८१ किलोग्रॅम प्लॅस्टिक जप्त करत ७०० प्रकरणांतून ३५ लाखांचा दंड वसूल केला. दुकाने व आस्थापना विभागाने १ एप्रिल २०२५ ते ३१ जुलै २०२६ या १६ महिन्यांच्या काळात मुंबईतील २४ प्रभागांमध्ये (वॉर्ड) विशेष मोहीम राबवली. या कालावधीत १ लाख १५ हजार ८३० दुकाने व आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यात ७,५०५ किलोग्रॅम प्लास्टिक जप्त करून १ कोटी ३० लाख ९५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. यात के-पश्चिम, के-पूर्व, एल आणि एम-पूर्व या वॉर्डांमध्ये सर्वाधिक जप्ती आणि कारवाईची नोंद झाली.

दुकाने व आस्थापना विभागाने सर्वाधिक ९ लाख ५३ हजार ७३४ भेटी देऊन १ लाख १ हजार २७८ किलोग्रॅम प्लॅस्टिक जप्त केले. या विभागाकडून १५,२४८ प्रकरणांमध्ये ७ कोटी ६४ लाख ४० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

## वाढदिवसानिमित्त ५० शाळांना शिवचरित्र वाटप

**| उरण | प्रतिनिधी |**

वाढदिवसाच्या उत्सवाला सामाजिक आणि ऐतिहासिक विचारांची जोड देत शिवचरित्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा अनोखा उपक्रम शिवभक्त श्रीमंत कौशिक ठाकूर यांनी राबविला आहे. त्यांच्या सुवर्ण महोत्सवी ५०व्या वाढदिवसानिमित्त उरण परिसरातील ५० शाळांना संपूर्ण शिवचरित्राचे वाटप करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकात वाचू नये, तर महाराजांचे स्वराज्याचे कार्य, शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी, संघटनकौशल्य आणि समाजहिताची भूमिका नव्या पिढीने समजून घ्यावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचा खर्च स्वतः च्या प्रसिद्धीसाठी करण्यापेक्षा तो विद्यार्थ्यांच्या हातात शिवचरित्र देण्यासाठी वापरण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. त्यामुळे या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

गडसंवर्धक म्हणूनही कौशिक ठाकूर यांचे कार्य उल्लेखनीय

### कौशिक ठाकूर यांचा अनोखा उपक्रम

आहे. रायगड परिसरासह विविध ऐतिहासिक गड-किल्ल्यांवर प्रत्यक्ष जाऊन गडसंवर्धनाच्या कामात ते सक्रिय सहभाग घेत आहेत. गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व जपणे, त्याबाबत जनजागृती करणे आणि तरुण पिढीला शिवकालीन इतिहासाशी जोडणे यासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

सुवर्ण महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ५० शाळांना संपूर्ण शिवचरित्र देण्याचा उपक्रम त्यांची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करणारा ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या हातात शिवचरित्र आणि मनात शिवविचार रुजविण्याचा प्रयत्न झाला आहे.

## मिनाक्षी म्हात्रे यांचे निधन

**रसायनी :** मिनाक्षी अशोक म्हात्रे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने म्हात्रे परिवारावर शोककळा पसरली असून, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच परिचितांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचे दशक्रिया विधी शिव मंदिर, गुळसुंदे येथे होणार आहे. तसेच उत्तरकार्य विधी रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी राहत्या घरी, मु. शिवनगर येथे होणार आहे. यावेळी सकाळी १० ते ११ वाजता वामन महाराज भोईर यांचे प्रवचन होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली.



## सविता देशपांडे यांचे देहदान

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मुंबई येथील रुपारेल महाविद्यालयाचे मराठीचे विभाग प्रमुख डॉ. सु.ना. देशपांडे यांच्या पत्नी निवृत्त शिक्षिका सविता सुरेश देशपांडे यांनी देहदान केले. सविता देशपांडे या लघु उद्योग चालवत होत्या. नेरळसारख्या भागातून त्यांच्याकडून ५५ महिलांना रोजगार उपलब्ध झाला होता. निवृत्तीनंतर सविता देशपांडे या नेरळ येथे महिलांसाठी हँडक्राफ्ट एक्सपर्ट म्हणून शिकवणी घेत होत्या. २०१७ पासून नेरळमध्ये हँडक्राफ्ट एक्सपर्ट म्हणून मुलींना हस्तकला धडे देण्यापासून त्यांच्याकडून निर्माण झालेल्या वस्तूंना मुंबईत बाजारपेठ मिळवून देण्याचे काम सविता देशपांडे यांनी केले आहे. वैद्यकीय आरोग्य शिबिरे आणि नेत्रदान चळवळीत अग्रभागी असलेल्या सविता देशपांडे यांनी मरणोत्तर देहदान करण्याचा निर्णय घेतला होता. आपल्या शिक्षिका जीवनात सविता देशपांडे यांनी देहदान करण्याचा केलेला संकल्प त्यांचे पुत्र यांनी त्यांच्या मृत्यूनंतर पूर्ण केला. या चळवळीतील कार्यकर्त्यांनी मेसेज दिल्यानंतर पनवेल येथून एमजीएम रुग्णालयाची टीम नेरळ येथे पोहचली आणि देहदान प्रक्रिया पूर्ण केली.



## चिबूड फळाला भाविकांकडून विशेष पसंती

**| पाली/बेणस | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाचे आगमन होताच बाजारपेठांमध्ये विविध प्रकारच्या पूजा साहित्यासोबतच रानफळांची मोठी आवक सुरू झाली आहे. या दिवसांत श्री गणेशाच्या पूजनासाठी आणि नैवेद्यासाठी चिबूड या फळाला भाविकांकडून विशेष पसंती दिली जात आहे. बाजारात चिबूड मागणी प्रचंड वाढल्याने ग्रामीण भागातील स्थानिकांना आणि महिला विक्रेत्यांना उत्तम रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.



पिकेलेले चिबूड हे फळ दिसायला पिवळ्या पांढ्या रंगाचे असून त्याला एक विशिष्ट मंद सुवास आणि गोडवा असतो. गणेशोत्सवाच्या काळात बाप्पाला चिबूड अर्पण करण्याची परंपरा आहे. शिवाय प्रसादांच्या फळांमध्ये देखील याचा वापर करतात. या फळाची खरेदी करण्यासाठी बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. सध्या हे फळ स्वस्त देखील मिळत असून छोट्या आकाराचे फळ वीस रुपयांना मिळत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी व महिला हे फळ थेट शेतातून किंवा परसबागेत पिकवून शहर व तालुक्यांच्या ठिकाणी विक्रीसाठी आणतात. सणासुदीच्या काळात या फळांच्या विक्रीतून स्थानिकांना उत्तम आर्थिक हातभार लागत असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसत आहे.

## वडाळे तलावाजवळ दुचाकीस्वारांची मनमानी

### • नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तरुणांवर कारवाई

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलमधील ऐतिहासिक वडाळे तलाव परिसरात दुचाकीस्वारांच्या वाढत्या धुमाकूळामुळे स्थानिक व ज्येष्ठ नागरिक, तसेच संध्याकाळी फिरायला येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पालिकेने कोट्यवधी रुपये खर्चून या तलावाचे सुशोभीकरण केले असून, हे ठिकाण पर्यटकांचे मुख्य आकर्षण बनले आहे. मात्र, काही बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे या परिसरातील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे. तरुण दुचाकीस्वार तलावाच्या बाजूच्या रस्त्यांवर सुसाट वेगाने गाड्या चालवतात आणि धोकादायक स्टंट्स करतात. त्यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे. गाड्यांचे सायलेन्सर बदलून मोठ्या आवाजात फटाके फोडल्यासारखा आवाज करत गाड्या फिरवल्या जातात. त्यामुळे परिसरात तीव्र ध्वनी प्रदूषण निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी उपलब्ध आहेत. याठिकाणी उद्भवणाऱ्या तक्रारीनंतर अनेकदा स्थानिक पोलिसांसह प्रादेशिक परिवहन विभागाने देखील कारवाईचा बडगा उगारला आहे. यावेळी विनाहेल्मेट मोटरसायकल चालविणे, मोटरसायकलवर ट्रिपल सीट किंवा चारसीट प्रवास करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मोटरसायकलवरून फिरणाऱ्या तरुणांवर वाहतूक शाखेच्या पथकाने नियमानुसार कारवाई केली. कारवाईदरम्यान संबंधित मोटरसायकल चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले.

## बांधकाम साईटवरील चोरीचा छडा

### • अडीच लाखांचे साहित्य जप्त

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनीजवळील भोकरपाडा येथील हिरानंदानी फॉर्च्यून सिटीच्या बांधकाम साईटवरून सुमारे ५० सेंट्रिंग प्लेट्स तसेच ॲल्युमिनियम प्लेट्स चोरीला गेल्याची घटना घडली होती. चोरी झालेल्या साहित्याची अंदाजे किंमत अडीच लाख रुपये असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी रसायनी पोलिसांनी चोरीचा छडा लावत सहा आरोपींना जेरबंद केले. यावेळी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहन पवार, राजू शिंदे, रवी चव्हाण, प्रिन्स पासवान, खरपत गुप्ता तसेच भंगार विक्रेता सोमनाथ गुप्ता यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच, चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमालही त्यांच्याकडून पोलिसांनी जप्त केला आहे. रसायनी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बांधकाम साईटवरून साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, चोरीचा मुद्देमाल परत मिळाल्याने संबंधितांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

**माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम** | **स्थानिक, जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन**

# मंडळांच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती

**| मुंबई | प्रतिनिधी |**

राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंतर्गतच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये 'लोकसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. 'लोकसंवाद-२०२६'मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांचा सहभाग असणार आहे.

शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती योजना सवलती यासह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. तर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.

### आंतरविभागीय समन्वयावर भर

'लोकसंवाद-२०२६' प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे. या कार्यक्रमांमध्ये स्थानिक क्षेत्रीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ प्रत्यक्ष गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करतील.

### कार्यक्रमांना व्यापक प्रसिद्धी

शक्य असेल तेथे कार्यक्रमांचे फेसबुक किंवा युट्यूब लाईव्ह करण्यात येणार असून, सोशल मीडियावर # गणेशोत्सव२०२६ आणि # लोकसंवाद२०२६ हे हॅशटॅग वापरण्यात येणार आहेत. या माध्यमातून प्रत्यक्ष कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांपर्यंतही योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे.

## निवडक

### कॅरिंग फ्रेंडकडून शाळांना स्मार्ट टीव्ही



**नेरळ :** कर्जत तालुक्यात शैक्षणिक विभागात कार्य करणाऱ्या कॅरिंग फ्रेंड या संस्थेकडून तालुक्यातील चार शाळांना स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आल्या. माथेरानमधील उद्योजक नितीन शहा यांचा यात महत्वाचा वाटा असतो आणि त्यांच्या पुढाकाराने तालुक्यात हे कार्य सुरू आहे. कॅरिंग फ्रेंड, मुंबई आणि नितीन शहा यांच्यामार्फत कर्जतमधील विविध शाळांना डिजिटल अँड्रॉइड स्मार्ट टीव्ही आणि शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. नितीन शहा यांचे हस्ते रायगड जिल्हा परिषद शाळा जुम्मापट्टीसाठी साउंड सिस्टीम, रायगड जिल्हा परिषद शाल उकरूळ यांच्यासाठी स्मार्ट टीव्ही, रायगड जिल्हा परिषद शाळा चई यांच्यासाठी स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आले. तर कर्जत शहरातील आमराई येथील अंगणवाडी शाळेसाठी देखील स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आली. यावेळी कॅरिंग फ्रेंड संस्थेचे कार्यकर्ते संघपाल वाठोरे, दीपक शहा, राकेश कोकळे, दिनेश सुतार हे उपस्थित होते.



### गौराईच्या निमित्ताने फुलांना मागणी

**खांदा कॉलनी :** गणेशोत्सवानंतर गौराईच्या सजावटीसाठी पनवेलचे भाजी मार्केट सज्ज झाल्याचे दिसून आले. गौराईच्या पूजेसाठी आणि सजावटीसाठी लागणाऱ्या विविध फुलांची आवक बाजारपेठेत वाढली होती. गौराईची सजावट आकर्षक करण्यासाठी महिला वर्गाकडून फुलांची खरेदी केली जात होती. परंपरेनुसार नदी, विहीर किंवा पाणवठ्याच्या परिसरातून तेरडा आणून गौराईची पूजा केली जाते. तेरड्यासोबत फुलांनी गौराईची आकर्षक सजावट करण्याची पद्धत अनेक ठिकाणी आजही कायम आहे. त्यामुळे बाजारपेठेत फुले, हार, वेण्या आणि पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी झाली होती. पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये फुलविक्रेत्यांकडे ग्राहकांची वर्दळ वाढली होती. विविध रंगांची फुले आणि आकर्षक हारांमुळे बाजारपेठेचे रूपही बदलले आहे. गौराईच्या आगमनामुळे फुलविक्रेते आणि पूजासाहित्य विक्रेत्यांमध्येही उत्साह दिसून आला. बाजारपेठेत वाढलेली फुलांची आवक पाहता गौराईच्या निमित्ताने फुलांना चांगली मागणी असल्याचे दिसून आले.



### उभ्या चारचाकी वाहनाला पेटवले

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहरातील गजबजलेल्या आठवडा बाजार परिसरात पहाटेच्या सुमारास उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाला अज्ञात इसमाने आग लावल्याची धक्कादायक घटना घडली. आग लावण्यापूर्वी संशयिताने वाहनाच्या काचा फोडल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आठवडा बाजार परिसरात उभ्या असलेल्या चारचाकीजवळ पहाटेच्या सुमारास एक अज्ञात इसम आला. त्याने प्रथम वाहनाच्या काचा फोडल्या आणि त्यानंतर वाहनाला आग लावली. काही क्षणांतच वाहनाने पेट घेतला. आगीच्या ज्वाला आणि धुराचे लोट पाहून परिसरातील नागरिकांच्या ही घटना लक्षात आली. नागरिकांनी तातडीने रत्नागिरी शहर पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच रत्नागिरी नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत चारचाकी वाहन मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले होते. दरम्यान, वाहनाला आग नेमकी कोणत्या कारणातून लावण्यात आली, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून आग लावणाऱ्या अज्ञात संशयिताचा शोध सुरू आहे.



### मनोज माळवदे यांना पुरस्कार

**बोर्ली पंचतन :** रायगड जिल्हा परिषदच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह महाड येथे आदर्श शिक्षक पुरस्कार व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी गुणगौरव समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी श्रीवर्धन तालुक्यातील रा.जि.प. शाळा बापवन शाळेतील गुणवंत शिक्षक मनोज पांडुरंग माळवदे यांना उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. माळवदे यांनी श्रीवर्धन तालुक्यातील देवखोल, कासारकोंड अशा दुर्गम ठिकाणी २८ वर्ष आपली सेवा केली आहे. तसेच काही वर्षे श्रीवर्धन तालुका शिक्षण विभागातील गट समन्वयक व प्रभारी म्हणून विस्तार अधिकारी शिक्षण या पदाचा कार्यभार सुध्दा यशस्वीपणे सांभाळाला होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये कासारकोंडसारख्या दुर्गम ठिकाणची शाळा ग्रामस्थांच्या सहकार्याने डिजिटल शाळा बनवली. शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात प्रोत्साहन देताना विज्ञान प्रदर्शनात ग्रामीण भागातील बापवन शाळेतील विद्यार्थ्यांचा तालुकास्तरीय प्रथम क्रमांक आला आहे. विद्यार्थ्यांना शालेय उपक्रमातून प्रत्यक्ष जीवनाभूत ज्ञानाचे धडे, अनुभव व प्रात्यक्षिक दिले. त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची योग्य ती दखल रायगड जिल्हा परिषदेने घेऊन त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## निवडक

### जयवंत पाटीलांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

अलिबाग : अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील राजिप शाळेतील प्राथमिक शिक्षक जयवंत पाटील यांना अविष्कार फाऊंडेशनकडून देण्यात येणाऱ्या गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. पाटील यांनी शिक्षक म्हणून काम करत असतानाच त्यांनी परहूरपाडा विभागात सामाजिक, शिक्षण, क्रीडा क्षेत्रात भरीव काम केले आहे. त्यांचीच पोहच पावती म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. तसेच त्यांनी त्यांच्या सेवाकाळात अलिबागसह मुरुड, पोलादपूर, महाड या तालुक्यांत एकूण २९ वर्ष सेवा केलेली आहे. रायगड जिल्ह्यातील नामांकित असलेल्या प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. अलिबागचे संचालक तथा व्हाईस चेअरमन म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ शाखा रायगडचे उपाध्यक्ष तसेच सध्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषद शाखा अलिबागचे कार्यवाहक म्हणून ते काम पाहत आहेत. दरम्यान, हा पुरस्कार वितरण कार्यक्रम शुक्रवार दि. २ ऑक्टोंबर २०२६ रोजी दुपारी २. वाजता आगरी समाज हॉल चिंचपाडा पेण येथे होणार आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन वर्षाव करण्यात येत आहे.



### सचिन घाडी यांना दीपस्तंभ पुरस्कार

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन हरिश्चंद्र घाडी यांना (दि.८) सप्टेंबर रोजी नाशिक येथे शिक्षक दिनानिमित्त दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थेच्या वतीने 'राष्ट्रीय दीपस्तंभ' पुरस्कार २०२६ हा पुरस्कार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे, अमित गर्जे, नाशिक रोटरी क्लब अध्यक्ष शिल्पाजी पारख, शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक कार्याध्यक्ष मारुती गोपाळ कुलकर्णी यांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर व पुरस्कारकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. घाडी हे मागील काही काळ सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य, क्रीडा, पर्यावरण, आदिवासी विकास यांसह इतर अनेक क्षेत्रात तन मन धन लावून समाजपयोगी व पर्यावरण संवर्धनाचे कार्य करत आहेत. त्यांनी आजपर्यंत विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय व कौतुकास्पद कार्याची अनेक सामाजिक संस्थांनी त्यांची दखल घेऊन विविध पुरस्कार देऊन गौरविले आहे. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते घाडी यांच्यासोबत दिलिप मोंढे, अनिल अनमाने, किशोर नागावकर, संजय अनमाने, वामन ठकरूळ, सतिश घाडी, अमित सकरे, गितेश ठकरूळ, सुयोग अनमाने, प्रथमेश करमेळे, सुबोध खाडे, करण खाडे आदी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.






### श्रमिक विद्यालयात ओझोन दिवस साजरा

**खांब :** पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे तसेच ओझोन थराच्या संरक्षणाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय, चिल्हे येथे जागतिक ओझोन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग रायगड अलिबाग परीक्षेत्र रोहा यांच्या विद्यमाने साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना जागतिक ओझोन दिवस, ओझोन थराचे महत्त्व, ओझोनच्या थरामुळे पृथ्वीचे होणारे संरक्षण तसेच पर्यावरण संवर्धनाची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाढते प्रदूषण, वृक्षतोड आणि पर्यावरणाचा ऱ्हास यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची माहिती वनपाल बारक्या जाधव व वनरक्षक सोमनाथ चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. लावलेल्या वृक्षांचे संगोपन करून ते मोठे होईपर्यंत त्यांची काळजी घेण्याचा तसेच 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरण वाचवा' असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होऊन निसर्ग संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याची प्रेरणा मिळाली.

### तळा शहरातील एटीएम ठप्प

**तळा :** ऐन गणेशोत्सवात तळा शहरातील बँक ऑफ इंडिया व स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएममध्ये पैसे नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गणेशोत्सवासाठी मुंबईहून हजारो चाकरमानी आपल्या गावी आले आहेत. सणासाठी खरेदी, सजावट व इतर खर्चासाठी रोख रकमेची गरज असते. मात्र, शहरातील दोन्ही प्रमुख राष्ट्रीयकृत बँकांच्या एटीएममध्ये पैसे नाहीत.




यामुळे नागरिकांना एटीएमसमोरून रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. अनेकांना तातडीच्या कामासाठी इतर खाजगी बँकांच्या एटीएमवर जास्त शुल्क भरून पैसे काढावे लागत आहेत, तर ज्येष्ठ नागरिकांची अधिक गैरसोय होत आहे.सणासुदीच्या काळात बँकांनी एटीएममध्ये पुरेशी रोकड ठेवणे अपेक्षित असताना बँक प्रशासनाचा हलगर्जीपणा दिसून येत आहे. यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत असून बँकांनी तातडीने एटीएममध्ये पैसे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९
- TANNA FINSERV शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्क: ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ऐन पावसाळ्यात भवानीपाड्यात पाणीटंचाई

- जलजीवन मिशन योजनेचा बोजवारा
- वर्षापासून नळाला पाणीच नाही

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायतीमधील बोरगाव गावच्या हद्दीत नव्याने वसलेल्या भवानीपाडा गावामध्ये ऐन पावसाळ्यात पिण्याचे पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झाले आहे. नळपाणी योजना सुरू झाल्याची घोषणा झाली पण वर्षभरात एक थेंब पाणीदेखील नळाला आलेले नाही. दरम्यान, कर्जत तालुका पाणी पुरवठा विभाग देखील याबाबत कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना करीत नसल्याने ग्रामस्थ हैराण आहेत.

भवानीपाडा हे ४० घरांची लोकवस्ती असलेले गाव कळंब बोरगाव रस्त्यावर आहे. उंबरखांड गावाच्या अलिकडे असलेल्या या गावासाठी जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना राबवली आहे. तेथे असलेल्या बोअरवेलमधून पाणी उचलून एका सीनटेक्स टाकीमधून टाकण्याची ही योजना आहे. तेथून ते पाणी पुढे गावात असलेल्या सार्वजनिक स्टँड पोस्ट आणि घरोघरी जोडलेल्या नळांना देण्याची ही योजना आहे.



या योजनेचे काम पूर्ण झाल्याचे ओलमन ग्रामपंचायतीकडून जाहीर झाले असून त्याला एक वर्षे पूर्ण झाले. मात्र, या वर्षभरात बोअरवेलमधील पाणी काही भवानीपाडा ग्रामस्थांचे घरी असलेल्या नळाला पोहचले नाही. त्यामुळे उन्हाळ्यात नाहीतर पावसाळ्यात नळाला पाणी येईल अशी ग्रामस्थांना अपेक्षा होती. परंतु उन्हाळ्यात काय? सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात देखील भवानीपाडा येथील नळ कोरडेच आहेत.

ग्रामस्थांच्या या वर्षभर सुरू असलेल्या त्रासाबद्दल स्थानिक ग्रामस्थ राजेश खडेकर यांनी संताप व्यक्त केला आहे. नळपाणी योजना सुरू होऊन नऊ दहा महिने झाले पण घरात पाण्याचा थेंब आला नाही. तर दुसरीकडे नळाचे पाणी साठवण्याची टाकी ज्या ठिकाणी आहे तेथे ती टाकीला पावसाळ्यात उगवलेल्या गवताने जंगली झाडांनी वेढा घातला आहे.

उन्हाळ्यात बोअरवेल कोरडी असेल तर पावसाळ्यात पाणी मिळेल अशी अपेक्षा असलेल्या स्थानिक ग्रामस्थांना पावसाळ्यात देखील पाणी मिळाले नाही. त्यामुळे नळाचे पाणी काही भवानीपाडा ग्रामस्थांच्या घशाखाली गेलेले नाही. अद्याप नळाचे पाणी मिळाले नसल्याने ग्रामस्थ संतप्त असून आपली व्यथा ग्रामस्थांनी कर्जत येथे जाऊन पाणी पुरवठा विभागाचे अभियंता यांच्या कानावर घातली. त्यावेळी बघतो पाहतो अशी उत्तरे अभियंत्यांनी दिली असून ठेकेदाराला पाठीशी घालण्याचा प्रकार जिल्हा परिषदेचे कर्जत पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी करीत आहेत.

> ग्रामस्थांची पाण्याची तहान आता पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी पागोळी म्हणुन गोळा करावे लागत आहे. शासनाने या योजनेची चौकशी करावी अशी आमच्या ग्रामस्थांची मागणी आहे.
> – राजेश खडेकर
> ग्रामस्थ

## कर्जत तालुक्यात पोलीस पाटलांची होणार नेमणूक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील रिक्त असलेल्या गाव पोलीस पाटलांची पदे भरण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. किमान १० वर्षे अनेक गावांमधील पोलीस पाटील यांचे पदे रद्द होती. दरम्यान कर्जत तालुक्यातील ७७ गावातील पोलीस पाटलांच्या नियुक्त्या लवकरच होणार असून कर्जत प्रांत अधिकारी कार्यालयाने अशी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

गावच्या सुरक्षेचे बाबतीत पोलीस पाटलांची भूमिका महत्वाची असते. या महत्वाच्या पदावर गेल्या आठ ते दहा वर्षात रिक्त असलेली पदे महसूल विभागाने भरली नव्हती. त्यामुळे पोलीस दलासमोर गुन्हेगारांचा माग काढण्यासाठी अडचणी येत होत्या. तसेच गुन्हेगारांना नोटीसा बजावणे ही प्रक्रिया गाव पातळीवर पोलीस पाटील नसल्याने अडचणीचे ठरत होते. त्यामुळे अखेर महसूल खात्याचे प्रांत अधिकारी कार्यालयाने पोलीस पाटील संवर्गातील पदभरती करणेबाबत कालबध्द कार्यक्रम जाहिर झाला आहे. पोलीस पाटील भरती प्रक्रिया सन २०२६ च्या अनुषंगाने आपले अधिनस्त महसूल गावाची प्रवर्गनिहाय सन २०११ च्या जनगणनेनुसार गावांची लोकसंख्या ग्राह्य धरून ही भरती केली जाणार आहे. त्यासाठी कार्यक्रम जाहीर झाला असून जवळपास ७७ पोलीस पाटील यांच्या नियुक्त्या करण्यासाठी जाहिरात काढण्यात आली आहे.अर्ज दाखल करणे, परीक्षा, मुलखात अशा स्वरूपात ही भरती प्रक्रिया चालणार असून अत्यंत पारदर्शक निवड केली जाणार असल्याचे महसूल विभागाने जाहीर केले आहे.



## खड्डे बुजवले, तरी विघ्न कायम

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

लोहप–चौक मार्गावरील खड्डे बुजविण्यात आले असले, तरी निकृष्ट पद्धतीने करण्यात आलेल्या डागडुजीमुळे पावसाळ्यात या मार्गाची अवस्था पुन्हा बिकट झाली आहे. सध्या पावसाचा जोर वाढल्याने बुजविण्यात आलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असून, वाहनचालक व प्रवाशांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. या वर्षात संबंधित मार्गावरील खड्डे दोन वेळा भरण्यात आले. मात्र, केवळ प्रवाशांची समजूत काढण्यासाठीच खड्डे बुजविण्यात आले की काय, असा सवाल प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे. खड्ड्यांची योग्य पद्धतीने डागडुजी न झाल्याने पावसाचे पाणी त्याच ठिकाणी साचत आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांनाअडचणींचा सामना करावा लागत असून, अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत खरेदीसाठी जाणाऱ्या गणेशभक्तांची मोठी वर्दळ आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने मार्गाची पाहणी करून खड्डे कायमस्वरूपी व दर्जेदार पद्धतीने बुजवावेत, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे.

### किराणा दुकानांमध्ये मद्य विक्री

**पनवेल :** किराणा दुकानांमध्ये मद्य विक्री केल्याप्रकरणी प्रकाश पाटील यांच्या विरोधात पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ११ सप्टेंबर रोजी चिन्द्रण येथील अष्टविनायक किराणा स्टोअर्स मध्ये ४ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने पोलिसांना सापडून आला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

### मुर्बी गावातून महिला बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर सेक्टर १९, मुर्बी गाव परिसरातून ३९ वर्षीय महिला बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे. सारिका आनंदराव सकटे (वय ३९) असे बेपत्ता महिलेचे नाव आहे. त्या खारघर सेक्टर १९, मुर्बी गाव येथील साईकृपा बिल्डिंगमधील रूम क्रमांक ३०६ येथे कुटुंबासह राहत होत्या. पडल्या. मात्र, त्यानंतर त्या घरी परतल्या नाहीत. कुटुंबीयांनी शोध घेतल्यानंतर खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

बेपत्ता महिलेची उंची सुमारे ५ फूट १ इंच असून बांधा बारीक, रंग गोरा, चेहरा उभा, केस काळे व मध्यम, नाक सरळ आणि डोळे काळे आहेत. घराबाहेर पडताना त्यांनी निळ्या रंगाची साडी परिधान केली

महिला बेपत्ता झाल्याची तक्रार मिळाल्यानंतर खारघर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

सदर महिलेबाबत कोणाला माहिती मिळाल्यास अथवा त्या आढळून आल्यास तातडीने खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, किंवा संबधित अधिकाऱ्यांशी संर्पक साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची नवी मुंबई कार्यकारिणी जाहीर

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या नवी मुंबई कोकण विभागीय कार्यालयात कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली. संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संघटक संजय भोकरे, महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे तसेच राज्य प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली.

याप्रसंगी नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष दशरथ चव्हाण, कार्याध्यक्ष जवाहरलाल पोळ, उपाध्यक्ष कल्याण हनवते, सचिव विष्णू बुरे, खजिनदार असते आलम मिर, सल्लागार सुनील गायकवाड, सल्लागार सुभाष जाधव, वाशी विभाग प्रमुख दीपक सोनवणे, सदस्य समीर शेख, संतोष गोळे, कलाम शहा, सुरेश दुधाने, विनोद धुरंदर, जितेंद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली. यावेळी पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. पत्रकारांचे संघटन अधिक मजबूत करणे, पत्रकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करणे तसेच पत्रकारांच्या हक्क व हितासाठी प्रभावीपणे काम करण्याबाबत बैठकीत मार्गदर्शन करण्यात आले.

## पाले गावातील पथदिवे बंद

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण पूर्व विभागातील ग्रुप ग्रामपंचायत आवरे येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत समाविष्ट असणाऱ्या पाले गावातील पदाचारी मार्गावरील पथदिवे गेल्या चार महिन्यांपासून बंद आहेत. याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांनी वारंवार घिरट्या घालून विचारणा केली असता, पथदिवे उद्या लावू परवा लावू असे आवरे ग्रामपंचायतीच्या ग्रामविस्तार अधिकारी वैशाली नागे यांच्याकडून वारंवार हेच उत्तर ऐकावयास मिळत आहे. त्यामुळे गावातील नागरिकांनी प्रशासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे. याविषयी ऑगस्ट महिन्यात घेण्यात आलेल्या ग्राम सभेत देखील ग्रामस्थांनी विचारणा केली होती. यावेळी पथदिवे



लावण्यात येतील असे ग्रामपंचायत प्रशासनाने आश्वासन देखील दिले होते. मात्र, ग्रामपंचायतीचे आश्वासन फोल ठरले आहे. पंधरा दिवसांपूर्वी साजरा करण्यात आलेला गोकुळ अष्टमीचा सण, त्यापाठोपाठ गणेशोत्सव सुद्धा अंधारातच चालला असून, आजपर्यंत पाले गावातील पथदिवे बंद आहेत. उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे कानाडोळा न करता, वेळीच लक्ष घालून ग्रामपंचायतीच्या सुविधा नागरिकांना देण्याबाबत जागृत रहावे असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

गणेशोत्सव साजरा होत असताना, गणेश भक्तांना रस्त्यावरच्या बंद पथदिव्यांमुळे अंधाराला सामोरे जावे लागत आहे. आवरे ग्रामपंचायतीवर गेली अनेक वर्षे प्रशासक काम करत असल्याने, या गोष्टीकडे प्रशासकांचे दुर्लक्ष होत असून, ग्रामपंचायत प्रशासनाच्या सुविधा ग्रामस्थांपर्यंत उशिरा पोहोचत आहेत. उदाहरणार्थ पाण्यात टाकण्यासाठी रुद्रजल, शेवाळ घालविण्यासाठी पावडर, धूरांडी यासह अन्य सुविधा या वेळ निघून गेल्यावर म्हणजेच कोणीतरी जाब विचारल्यावरच केल्या जात आहेत. याकडे प्रशासक अनिता ढमढेरी व ग्रामविस्तार अधिकारी वैशाली नागे यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे असून तेथील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## पनवेलमध्ये साखरचौथ गणपतीच्या तयारीला वेग

**। खांदा । वार्ताहर ।**

गणेशोत्सवाची लगबग ओसरत असतानाच आता गौरी–गणपतीच्या पुढील सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. पितृपक्षाच्या काळात येणाऱ्या साखरचौथ गणपतीसाठी पनवेलमध्ये काही ठिकाणी मंडप उभारण्यास सुरुवात झाली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी मंडळांचे कार्यकर्ते मंडप उभारणी आणि सजावटीच्या कामात व्यस्त झाले आहेत. गौरीच्या आगमनाचीही घराघरांत तयारी सुरू झाली असून महिला वर्गामध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे.



गणपतीनंतर गौरीच्या आगमनामुळे पुन्हा एकदा घराघरांत भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. अनेक कुटुंबांमध्ये गौरीचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्याची तयारी सुरू आहे.

पनवेलच्या बाजारपेठेत गौरीच्या पूजेसाठी आवश्यक साहित्य दाखल झाले आहे. त्यामुळे बाजारपेठेतही सणासुदीची लगबग दिसून येत आहे.साखरचौथ गणपतीसाठी काही सार्वजनिक मंडळांनी आकर्षक देखावे उभारण्याची तयारी सुरू केली आहे. मंडपाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई आणि सजावटीचे साहित्य आणण्यास सुरुवात झाली आहे.

कार्यकर्त्यांकडून मंडपाची उभारणी आणि परिसर स्वच्छतेची कामे केली जात आहेत. गौरी–गणपतीच्या निमित्ताने नातेवाईक आणि आप्तेष्टांच्या भेटीगाठींनाही सुरुवात होणार आहे.

पितृपक्षाच्या पार्श्वभूमीवर धार्मिक परंपरा आणि उत्सव यांचा अनोखा संगम या काळात पाहायला मिळतो. गौरीच्या आगमनासाठी महिला वर्गाकडून पारंपरिक पद्धतीने तयारी केली जात आहे.

घरातील गौरीची आरास, पूजेची तयारी आणि नैवेद्याची लगबग सुरू झाली आहे. काही ठिकाणी गौरीच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. साखरचौथ गणपतीच्या आगमनाला अवघे काही दिवस उरल्याने मंडळांची धावपळ वाढली आहे. पनवेल शहरातील विविध भागांत मंडप उभे राहू लागल्याने उत्सवाची चाहूल पुन्हा एकदा लागली आहे. गौरीच्या स्वागतासाठी महिला वर्ग सज्ज झाला असून साखरचौथ गणपतीच्या तयारीलाही वेग आला आहे.

### जुगार प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तीन पत्ती जुगारावर कारवाई करत खांदेश्वर पोलिसांनी आकाश शामराव यादव, अर्जुन किशोर जाधव, सुरज सुरेश माझी यांच्या विरोधात ११ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल केला. आसुडगाव एक्सप्रेस हायवेच्या ब्रिजच्या बाजूला, रेल्वे बॅटरीच्या लागून रहदारीच्या मोकळ्या सार्वजनिक ठिकाणी तीन पत्ती जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून १ हजार ३०० रुपये जप्त केले.

## नवसाला पावणारा मूगवलीचा स्वयंभू गणपती

**सलीम शेख**

मराठी मनाचे गणेश हे लाडके दैवत आहे, त्या गणेशाची पुजाअर्चा करूनच शुभकामाला सुरूवात केली जाते. कोकणात या गणेशोत्सव काळात भक्तीला उधाणच येते. गजाननाची अनेक रुपे आहेत. त्यापैकीच एक असलेल्या माणगाव जवळील मुगलीच्या गणपतीचे स्थान हे जागृतम्हणून परिचीत आहे. शिवाय भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती म्हणूनही त्याची सर्वत्र ख्याती आहे. मुंबई–गोवा महामार्गावर माणगावपासून तीन कि. मी. अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दिड किमी अंतरावर हे स्वयंभू गणेश मंदिर आहे. मुगवली हे शंभर ते सव्वाशे घरांचे छोटे गाव आहे. सुमारे ३२५ वर्षापूर्वी मुगवलीच्या परिसरातील एका शेतात एक शेतकरी नांगरणी करीत होता. अचानक शेतातील एका दगडास नांगराचा फाळ लागून तेथून रक्त येऊ लागले. हे पाहून त्या शेतकऱ्याने गावाकडे धाव घेऊन घडलेली सर्व हकीकत गावकऱ्यांना सांगितली. सर्व ग्रामस्थांनी याबाबत गोरेगावच्या जाणकारांचा सल्ले घेतला व हे गणेशाचे स्वयंभू महास्थान आहे, असे त्यांनी सांगितल्यावर ग्रामस्थांनी त्या पाषाणाभोवतालची जागा स्वच्छ केली. त्यानंतर सर्वांनाच नैसर्गिक अवस्थेतील गणेशाचे मोहक दर्शन झाले.



मूर्ती जमिनीतून वर आलेल्या दोन फूट लांबी–रुंदीच्या पाषाणावर नैसर्गिक अवस्थेत असून, मस्तक, उभी वळलेली सोंड, पोट अशा स्वरुपाची आहे. मागील बाजूस सिंह असून, त्यास पाठ टेकून खाली पाय सोडून तो बसलेला आहे. गणेशाचे नेत्र नैसर्गिक अवस्थेत असल्यामुळे त्याचे डोळे बोलके वाटतात. सर्व ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी सुरूवातीस एक कुडाचे मंदिर उभारले. त्यानंतर प्राचीन काळातील या मंदिराचा ३५ वर्षापूर्वी जीर्णोद्धार करून गाभाऱ्यात संगमरवरी दगड बसविण्यात आला व मंदिरही थोडे प्रशस्त करण्यात आले.

१९६८ साली मुगवलीच्या स्थानिक स्वयंभू गणेश मंडळाने गणेश व्यवस्थापन समिती स्थापन करून श्रींच्या भोवती उत्तमपैकी छोटासा गाभारा बांधला आणि दररोजच्या गणेशपुजेची व्यवस्था केली. पूर्वीच्या जुन्या कौलारू मंदिराचे रुपांतर आता भव्य अशा सिमेंट कॉंक्रीटच्या २२ फूट रुंद व ३० फूट लांब अशा सुंदर मंदिरात झाले आहे. मंदिराचे शिखर मुंबई–महाड महामार्गावरील मुगवली फाट्याजवळूनही दिसते. येथील गणेश हा पूर्वीभिमूख आहे. त्यामुळे गणेशाच्या मूर्तीवर दररोज सूर्यकिरण पडावेत अशीही कल्पकता मंदिर बांधताना योजण्यात आली आहे. हा गणेश नवसाला पावतो अशी भाविकांची श्रद्धा असल्याने हा गणपती जागृत देवस्थान म्हणून परिचीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून तसेच मुंबई–पुण्यातून भाविक मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी येऊन येथे नवस बोलतात व आपण बोललेला नवस फेडण्यासाठीही मोठ्या संख्येने येत असतात.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल धिरेंद्र गौतम रा. ए-६०२, कुकरेजा इस्टेट सीएचएस, प्लॉट नं. ३६, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४ यांनी खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे खालील नमुद विद्यमान मालक यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे वडवली, ता. कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे**

| जमीन मालक | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) प्रणय रामनाथ भेंडे<br>२) चिराग रामनाथ भेंडे<br>२) हेमलता रामनाथ भेंडे | ४०/१५ | क्षेत्र ०.१४.७०<br>पोट खराबा ०.००.८०<br>एकुण क्षेत्र ०.१५.५० | १.६९ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे

तारीख :- १८/०९/२०२६

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड

जा.क्र. ७९८

**फॉम झेड**
**नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १२/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री.राकेश कृष्णा म्हात्रे मु-काश्मिरे, पो-कांदळेपाडा, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यंतची रक्कम रूपये १६,३५,०१९/-व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील ११.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून

श्री. राकेश कृष्णा म्हात्रे यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.

ग्रुप ग्रामपंचायत मळेघर ता.पेण मालमत्ता क्र. २०४/ब क्षेत्रफळ ७२६ चौ. फुट

येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये १६,३५,०१९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

कर्जदार :- श्री. राकेश कृष्णा म्हात्रे

श्री. राकेश कृष्णा म्हात्रे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन.

ग्रुप ग्रामपंचायत मळेघर ता.पेण मालमत्ता क्र. २०४/ब क्षेत्रफळ ७२६ चौ.फुट

स्थळ : पेण

दिनांक : १६/०९/२०२६

**श्री. अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे गिरवले, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं | खाता नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| १०९/२ | २५० | ०-३७-३०<br>पो.ख ०-०२-६०<br>खरेदी क्षेत्र ०-३९-९० | ७.४७ |
| | | एकुण क्षेत्र ०-३९-९० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात सविता कुमारी चोप्रा यांच्या नावाची नोंद आहे, त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलाना खरेदी देण्याची ठरली असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत, दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घमुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांपर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरीता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७.०९.२०२६
ठिकाण : पनवेल

**ॲड. प्रविणकुमार पांडुरंग मोरे**
पत्ता : ऑफीस नं.०३, आशा हॉमोनी को ऑप हौ.सो प्लॉट नं. १४, सेक्टर-१७,
खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६ मो.नं ९०२९५८९९९०

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड

**जा.क्र.७९७**

**फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११))**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १४/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०८/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. जनार्दन रामचंद्र पाटील मु.पो.रावे, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यंतची रक्कम रूपये १७,०३,९१९/-व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील ११.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून

श्री. जनार्दन रामचंद्र पाटील यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.

१. ग्रुप ग्रामपंचायत रावे ता.पेण मालमत्ता क्र. ३०८/ब/१ क्षेत्रफळ ५७५ चौ. फुट
२. ग्रुप ग्रामपंचायत रावे ता.पेण मालमत्ता क्र. ३०८/ब/३ क्षेत्रफळ ५७५ चौ. फुट

येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये १७,०३,९१९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

**कर्जदार :- श्री. जनार्दन रामचंद्र पाटील**

श्री. जनार्दन रामचंद्र पाटील यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.

ग्रुप ग्रामपंचायत रावे ता. पेण मालमत्ता क्र. ३०८/ब/१ क्षेत्रफळ ५७५चौ. फुट

ग्रुप ग्रामपंचायत रावे ता. पेण मालमत्ता क्र. ३०८/ब/३ क्षेत्रफळ ५७५चौ. फुट

स्थळ : पेण

दिनांक : १६/०९/२०२६

**श्री. अजित नामदेव भगत**
**वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे तळवळी ता. मुरूड, जि. रायगड येथील खालिल वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संजय पांडुरंग म्हात्रे यांचेकडुन खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबद्दल त्या मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या पक्षकारांस संमती दिली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग. नं./हि. नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे तळवळी ता. मुरूड | ४३ | ०२.१९.००<br>पो. ख. ००.३५.००<br>एकुण ०२.५४.०० | १.६९ |

सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी वरील मिळकत निर्वेध असल्याबाबत हवाला दिला आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, दान गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहीवाट, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र व पुराव्यासहीत सादर करावा.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कुणाचाही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

सही/-

अलिबाग
दिनांक /०९/२०२६

**ॲड. अमित अर्जुन राणे**
मु. पो. कुरूळ, ता. अलिबाग जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनांच्या बिनशेती जमीन मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा | ९६/क | बिनशेती १-९९-०० | १९.९० |
| ता. अलिबाग | २/ब | बिनशेती ३-४०-०० | ३४.०० |

वर वर्णन केलेली संपूर्ण जमीन मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेल्या मिळकती ह्या विद्यमान मालक मे. स्वराज डेव्हलपर्स तर्फे पार्टनर अश्विनी अरूण दातार, वैशाली प्रसाद जोग यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक- १७/०९/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मीनारायण, पहिला मजला, गाळा नं. ७ व ८, ब्राह्मण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

दिनांक :- १८/०९/२०२६

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी सुधीर मारुती पालव यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील मौजे खांडपोली ता. सुधागड, जि. रायगड येथील पुढील प्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-खांडपोली, ता.सुधागड, जि.-रायगड येथील**

| गट नं. | एकुण हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| १८५/५ | १-२६.००<br>पैकी ०-४०.०० | ०.३५ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क- हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सुधीर मारुती पालव यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक १८/०९/२०२६.

**श्री.नरेश गोविंद शिंदे,**
ॲडव्होकेट पत्ता :- मु.पो.पाली, ता.सुधागड, जि. रायगड ४१०२०५
मोबाईल नं. ०८४८३९९४३४३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत आमचे अशिलानी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री. दयाळ मधुकर पाटील व इतर | ३६/१२ | ०.६०.०० | ०.४७ |

**वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तद्ंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुध्दा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक- श्री. दयाळ मधुकर पाटील व इतर यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : १८/०९/२०२६

सही/-

**ॲडव्होकेट मीनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता - शॉप नं. १६, श्री नेमीनाथ हाईटस्, मुद्रे (बुद्रुक), ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहिर हरकत नोटीस

आमचे अशील श्री. शैलेश रमणिकलाल शहा रा. ६ अमरकुंज, पहिला मजला, जे.बी. नगर अंधेरी पूर्व, मुंबई यांनी दिलेल्या माहितीवरुन त्यांचे वतीने तमाम जनतेस या जाहिर हरकत नोटीसीद्वारे कळविण्यात येते

| अनु.क्र. | गट नं./सर्वे नं./हि. नं | क्षेत्र | विवादीत क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | २७/० | ००-०७-८ | ०.०२.६० | ०.०६ |
| २ | २८/ | ०१-६३-० | ०.५४.३३ | ०.८४ |
| ३ | ३३/० | ००-७०-० | ०.२३.३३ | ०.५६ |
| ४ | ४३/१२ | ००-०१-५ | ०.००.५० | ०.०२ |
| ५ | ५८ | ००-२८-३ | ०.०९.४३ | २.०९ |
| ६ | ४३/१४ | ००-०१-५ | ०.००.५० | ०.०२ |
| ७ | ४३/१५ | ००-१०-७ | ०.०३.५६ | ०.०९ |
| ८ | ४३/१९ | ००-८७-० | ०.२९.० | ०.६६ |
| ९ | ४३/२० | ००-२३-५ | ०.०७.८३ | ०.३७ |
| १० | ४३/२२ | ००-०७-० | ०.०२.३३ | ०.०३ |
| ११ | ५९/३ | ००-०३-० | ०.०१.०० | ०.०५ |
| १२ | ५९/४ | ०१-१८-६ | ०.३९.५३ | ६.२३ |
| १३ | ६३/० | ००-६५-० | ०.२१.६६ | ०.५९ |
| १४ | ६५/१अ | ००-४४-० | १.५५.३३ | २३.८६ |
| १५ | ६६/० | ००-९४-८ | ०.३१.६० | २.७२ |
| १६ | मौजे-निगडोली ११/० | ०-९०-० | ०.३०.०० | |

वरील मिळकतीपैकी उपरोक्त विवादीत क्षेत्र हे या जाहिर हरकत नोटीसीचा विषय आहे.

वरील नमुद मिळकती या आमचे अशिलांच्या स्वसंपादित प्रत्यक्ष ताबेकब्जे वहिवाटीतील मिळकती असून सदर मिळकतींबाबत मा. मंत्री महसूल विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात आर.टी.एस. रिव्हीजन अपिल क्र. १०८९/२०२०, रिव्हिजन अपिल क्र. १४७८/२०२६, १४७९/२०२६, १४८०/२०२६ आणि १४८१/२०२६ प्रलंबित आहेत. सदर मिळकतीबाबत वाद न्यायप्रविष्ट (Sub - Judice) आहे. सदर प्रलंबित प्रकरणामध्ये आमचे अशीलांनी सदर मिळकतींमध्ये त्रयस्त व्यक्तीचा हक्क निर्माण करु नये मिळकतीतील जैसे थे परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती मा. मंत्री महसूल यांना केली आहे.

सबब याद्वारे सर्वांना सक्त ताकीद देण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, बक्षीसपत्र, साठेखत, लीज, कुळ, डेव्हलपमेंट करार अथवा पॉवर ऑफ ॲटर्नी असा कोणताही व्यवहार करु नये. या उपरही असा व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व जोखीम व्यवहार करणाऱ्या, घेणाऱ्या इसमाची राहील. सदर व्यवहार मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ (Lis Pendens) नुसार बेकायदेशीर व आमचे अशील यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण - खालापूर
दिनांक - १७/०९/२०२६

सही/-
आपले,
**श्री. शैलेश रमणिकलाल शहा**
यांचेतर्फे वकील
**ॲड. महेश एच. मोहिते**
रा. अष्टगंध को.ऑप. हा.सो. रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२३४३६३२७

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## सार्वजनिक नोटीस

सर्व संबंधित व्यक्तींना तसेच सर्वसामान्य जनतेस या सार्वजनिक नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्रीमती मृदुला विजय दळवी यांचे दिनांक ०२/१२/२०१३ रोजी निधन झाले आहे. त्यांच्या निधनाच्या वेळी त्यांचा मापगाव, अलिबाग, जि. रायगड येथे स्थित असलेल्या निवासी घर/मालमत्तेवर, मालमत्ता क्र. २४२ (यापुढे 'सदर मालमत्ता' असे संबोधण्यात येईल) हक्क, मालकी हक्क व स्वारस्य होते.

श्रीमती मृदुला विजय दळवी यांच्या पश्चात खालील केवळ तीन कायदेशीर वारस आहेत, ते पुढीलप्रमाणे :-

१. श्री. विजय सखाराम दळवी- पती
२. श्री. रुपेश विजय दळवी - मुलगा
३. श्रीमती रुपाली संजय ठाकूर- मुलगी

सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा, वारसाचा, कायदेशीर प्रतिनिधीचा, संस्था अथवा इतर कोणत्याही व्यक्ती/संस्थेचा कोणताही हक्क, मालकी हक्क, हिस्सा, स्वारस्य दावा, मागणी, हरकत, तारण, बोजा किंवा अन्य कोणताही अधिकार असल्यास, तसेच वरील नमूद केलेल्या कायदेशीर वारसांबाबत कोणाचीही काही हरकत असल्यास, त्यांनी त्याबाबतचा दावा/हरकत आवश्यक त्या समर्थनार्थ कागदपत्रांसह लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत कळवावा व सादर करावा.

वरील नमूद केलेल्या मुदतीमध्ये कोणताही दावा, हरकत अथवा मागणी प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा किंवा हरकत नाही, असे गृहीत धरले जाईल आणि या नोटीसीमध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे सदर मालमत्तेबाबतची आवश्यक कायदेशीर/मालकी हक्कासंबंधीची पुढील कार्यवाही कोणतीही पुढील नोटीस न देता करण्यात येईल.

वरील १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा हरकती विचारात घेतले जाणार नाहीत.

दिनांक : ११/०९/२०२६
ठिकाण : अलिबाग, रायगड
नोटीस देणारे :
**ॲड.विनायक एस.कदम**
ऑफिस क्र. ३, बाली टॉवर,
स्टेशन रोड, कळवा (पश्चिम),
ठाणे-४००६०५.
मोबाईल क्र.: ९८२११८४२३४
ई-मेल : vinayakkadam103@gmail.com

## अलिबाग नगरपरिषद
## जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्रं. /२०२६ दि.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३३/४७/०५१५१ | भाजी मार्केट जवळ, अलिबाग | चौथा मजला, सदनिका क्र.४०७ | अल्ताफ अब्दुल नाईक व आफ्रिन अल्ताफ नाईक | जकेरिया ईलयास सय्यद |
| २ | २ | १६१९अ/२डी विंग/०४६४९ | ब्राम्हण आळी अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०२प/म | मे सावित्री कंस्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन | आशिष अशोक गंभीर |
| ३ | २ | १५९५/०५१५१ | ब्राम्हणआळी अलिबाग | चौथा मजला, सदनिका क्र.४०७ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर हार्दिक पिनाकीन अजमेरा | विश्वास एस सहस्त्रबुद्धे व वर्षा विश्वास सहस्त्रबुद्धे |
| ४ | २ | ९२७/०१२१९ | मिरची गल्ली, अलिबाग | सदनिका क्र. ०१,०२,०३,०४,०५ ०६,०७,१०१,१०२, १०३ | हबीबाबाई अब्दूल लतीफ मेमन वैगरे ११ | मोहसिन इकबाल मेमन, रमजान ईकबाल मेमन, आर्शीन सोहेस मेमन व सोहेल इकबाल मेमन |
| ५ | २ | ९२८/०१२२० | मिरची गल्ली, अलिबाग | सदनिका क्र. १,२,३,४ | हबीबाबाई अब्दूल लतीफ मेमन वैगरे ११ | मोहसिन इकबाल मेमन, रमजान ईकबाल मेमन, आर्शीन सोहेस मेमन व सोहेल इकबाल मेमन |
| ६ | २ | १६१९अ-डी-१४/०४६७८ | ब्राम्हणआळी, अलिबाग | तळमजला, सदनिका क्र.१४/१७ | मे सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन | आशिष अशोक गंभीर |
| ७ | २ | १५९५/०५१५१ | ब्राम्हणआळी अलिबाग | दुसरा मजला, सदनिका क्र.२०३ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर वरून मयुर अजमेरा | अर्चना संदेश पाटील |
| ८ | २ | १३५८/०१६२५ | ब्राम्हणआळी अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१ | नितीन सुर्यकांत म्हात्रे | श्रुतिका रविंद्र पाटील |
| ९ | २ | ८६४/ए विंग २/०४३८६ | जुना भाजी मार्केट अलिबाग | तळमजला, वाणिज्य गाळा क्र.०४ | पुर्णा सागर पाटील, दिपक कमळाकर पाटील व कविता दिपक पाटील | प्रतिमा प्रदीप चव्हाण |
| १० | २ | १५५३/०१८४७ | ब्राम्हणआळी, रामनाथ रोड, अलिबाग | पहिला मजला निवासी सदनिका क्र.१०३ | नामदेव पांडुरंग तांबाडकर व सुनिता नामदेव तांबाडकर | वैभव नामदेव तांबाडकर |
| ११ | २ | १४३४ बी विंग/ ०१६९९ | ब्राम्हण आळी, कामत गल्ली, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०१ | सुरेखा गंगाधर जगताप | मंगेश भास्कराव कायटे |
| १२ | २ | १८८३/०२२३० | रामनाथ रोड, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०३ | प्रसाद रामचंद्र कविटकर व प्राजक्ता प्रसाद कविटकर | ओमप्रसाद हरिश्चंद्र पडते |
| १३ | २ | १६८/००२२२ | कोळीवाडा, अलिबाग | सदनिका क्र.१ | जनी तमीज बागवान व हमीद तमीज बागवान | रियाज नजीर फकी, मिकात शराफत फकी व मोईन शराफत फकी |
| १४ | २ | ५५१/अ/०४९१८ | चेंढरे, अलिबाग | सदनिका क्र.१०३ | मे दिपिका कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा संतोष दामोदर मोरे | माधवी मिलिंद बांदिवडेकर |
| १५ | २ | ३९५/००४७२ | ठिकरूळ नाका, अलिबाग | सदनिका क्र. १,२,३,१०१,१०२,१०३ | अरविंद शंकर राऊत वगैरे १० | मंगेश दामोदर म्हात्रे व शार्दुल मंगेश म्हात्रे |
| १६ | २ | १५९५/०५१५१ | ब्राम्हणआळी, अलिबाग | पहिला मजला सदनिका क्र.१०१ | मे ए कॉर्प तर्फे पार्टनर ऋषभ मयुर अजमेरा | अजित शांताराम पिटनाईक व दर्शना अजित पिटनाईक |
| १७ | ३ | १५८२/०१८८८ | ब्राम्हणआळी, अलिबाग | सदनिका क्र.२०७ | विजय भास्कर घरत | अर्चना धनंजय नामजोशी |
| १८ | २ | १४५६/०१७१७ | स्टेट बँकजवळ, अलिबाग | तळमजला, दुकान गाळा क्र.०६ | वृंदा विनायक मराठे व शैलेश विनायक मराठे | अंजली प्रशांत मालवणकर |
| १९ | २ | ८६४/ए विंग - १०/०४३९३ | जुना भाजी मार्केट जवळ, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.३०१ | सुनिल नरेश थळे | सौरभ रसुल शेख व शबाना सौरभ शेख |
| २० | २ | २४ अ श्रीबाग २/०२५४५ | श्रीबाग-२ अलिबाग | सदनिका क्र.१,१०१ | कामरान शमशाद अन्सारी | महम्मद नौशाद उस्मान व नरगिस नौशाद शेख |
| २१ | २ | ५९५/३ ए विंग/०४३०७ | चेंढरे, अलिबाग | तिसरा मजला सदनिका क्र.३०३ | मे.डी.एस.पी.कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स पार्टनरशिप फर्म तर्फे भागीदार सौ. प्रियदर्शिनी संजय पाटील व मे.डी.एस.पी. कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स पार्टनरशिप फर्म तर्फे भागीदार सौ.दिपा आशिष जगे | उज्वला पराग पाटील |
| २२ | ३ | १३०९B विंग/०१५७१ | पागाची गल्ली, अलिबाग | सदनिका क्र.००१ | माधवी रमेश परांजपे | अभिजित रमेश परांजपे |
| २३ | २ | ४७५/ब/००६०३ | श्रीबाग ३, अलिबाग | दुसरा मजला, फ्लॅट क्र.६ | जयंत मधुकर वाखारकर | रायझिंग एंटरप्रायझेस प्राय.लिम. जुल्फिकर महम्मद धनसे |
| २४ | २ | ४७५/ब/००६०३ | श्रीबाग ३, अलिबाग | तळमजला, फ्लॅट क्र.१ | जयंत मधुकर वाखारकर | रायझिंग एंटरप्रायझेस प्राय.लिम. जुल्फिकर महम्मद धनसे |
| २५ | २ | १२७६ अे विंग/०१५३९ | बालाजीनाक्याजवळ अलिबाग | दुसरा मजला, ए विंग निवासी सदनिका क्र. २०३ | अफरोज फिरोज खान व मेहरूनिसा शहाबुद्दीन नाकवा | गुंडाप्पा काशिनाथआप्पा थोंटे |
| २६ | ३ | १३४५Aविंग/००६१० | ब्राम्हणआळी, रामनाथ रोड, अलिबाग | पहिला मजला, सदनिका क्र.१०१ | एकता एकनाथ देवळेकर व एकनाथ बबन देवळेकर | एकनाथ बबन देवळेकर |
| २७ | २ | ३३/४२/०४१९१ | भाजी मार्केटजवळ, अलिबाग | चौथा मजला, सदनिका क्र.४०२ | हितेश छटवाल तर्फे दस्तऐवज प्रवेशासाठी कु.मु.इस्तीयाज जहांगीर सैय्यद | सईद अब्दुल लतिफ खान |
| २८ | २ | ३३/४१/०४१९० | भाजी मार्केटजवळ, अलिबाग | चौथा मजला, सदनिका क्र.४०२ | हितेश छटवाल | अब्दुल मजीद अब्दुल लतीफ खान |
| २९ | २ | ८२५/०५१८५ | जुन्या पोटाची गल्ली, अलिबाग | तळमजला निवासी सदनिका क्र.१/अ | अब्दुल समद महामूद पल्लवकर | अर्श अशरफ अनवारे |

**सही/-**
**मुख्याधिकारीकरीता**
**अलिबाग नगरपरिषद**

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



●माणगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य रणधीर कनोजे यांच्या सिद्धीनगर येथील निवासस्थानी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी गणरायाचे दर्शन घेतले. (छायाचित्र : सलीम शेख)



● श्री. मनोज भाई मु. वढाव, बामणगाव यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर, सामाजिक कार्यकर्ते, बामणगाव.



● रविंद्र पाटील मु. कुरुळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर, सामाजिक कार्यकर्ते, बामणगाव.



● श्री. रोहन मगर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर, सामाजिक कार्यकर्ते, बामणगाव.



● श्री. नरेंद्र पाटील (भाकरवड) यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर, शेकाप पुरोगामी युवक संघटना सदस्य, बामणगाव.



● श्री. श्रीधर रघुनाथ बारस्कर मु. तुडाळ, वायशेत यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुंदर सुबक मुर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. दिपक इंद्रे मु. परहूर, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मुर्ती व नयनरम्य देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. दिपक इंद्रे मु. परहूर, अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मुर्ती व नयनरम्य देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● सतीश पाटील व समीर पाटील मु. मापगाव-अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मुर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● रोशन शिवराम म्हसकर, मु. नारपोली, सोमटने-पनवेल यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशाची मूर्ती व आकर्षक देखावा.



● योगेश/प्रथमेश प्रकाश वार्डे, मु. रांजणपाडा, आवास- अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मुर्ती व नयनरम्य देखावा.




● घाडी बंधु, मु. मुनवली-अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मुर्ती व आकर्षक देखावा. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● चक्रपाणी मोहन पाटील पेझारी-आंबेपूर यांच्या निवासस्थानी गणपती बाप्पाचे आगमन. (छायाचित्र : जीवन पाटील, भाकरवड)



● रेवदंडा येथील बिपीन काशिनाथ बनिया यांच्या निवासी श्री गणरायाची आकर्षक सजावट (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल-आग्राव येथील नरेंद्र लोदीखान यांच्याकडील गणेशाची सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● चौल दादर येथील सौ. तृप्ती महेंद्र खोत यांच्या निवासस्थानी गणरायाची आकर्षक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● संग्रह महेंद्र घरत, चौल घरत आळी यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची मनमोहक सजावट (छायाचित्र : सुरेश खडपे)



● अनिल काशिनाथ नाईक, चौल घरत आळी यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची मनमोहक सजावट (छायाचित्र : सुरेश खडपे)




## राशीभविष्य

- **मेष** : कोणावर अतिविश्वास टाकू नका. परिस्थितीत अनुकूल बदल होतील. आर्थिक बाबतीत विचार करा.
- **वृषभ** : विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. तुर्तास गुंतवणुकीचा विचार करू नये.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात आपली बाजू वरचढ ठरेल. वरिष्ठांशी सल्लामसलत महत्त्वाची राहील. बाकी चिंता नको.
- **कर्क** : व्यवसायात स्थिती साधारण राहील. आर्थिक व्यवहार विचारानं करावे. विद्याथर्थ्यांना यश लाभेल.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात इतरांशी जमवून घ्या. जमा-खर्चाचा ताळमेळ राखावा. कौटुंबिक मतभेद टाळायला हवे.
- **कन्या** : अनावश्यक खर्च टाळावा. वरिष्ठांच्या तुमच्याकडून अपेक्षा वाढतील. पित्ताचे विकार संभवतात.
- **तूळ** : तुमच्या कर्तृत्त्वाची इतरांवर छाप पडेल. हाती घेतलेलं कार्य सफल होईल. हातून शुभकार्य घडेल.
- **वृश्चिक** : व्यवसायवृध्दीच्या उत्तम संधी लाभतील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. समाधानी रहाल.
- **धनु** : जबाबदारीची जाणीव ठेवावी. नव्या ओळखी कामी येतील. प्रवासात मौल्यवान वस्तू सांभाळाव्या.
- **मकर** : कामात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. गुंतवणूक विचारानं करावी.
- **कुंभ** : कामाचा व्याप वाढेल. धावपळ, दगदगीमुळे प्रकृती अस्वास्थ राहील. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहील.
- **मीन** : मिळणाऱ्या संधींचा लाभ घ्यावा. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. गैरसमजांपासून दूर रहावं.

## स्टाईल स्टेटमेंट

# स्टायलिश बॉटम्स

सलवार-कमीझ हा पेहराव कोणत्याही प्रसंगी शोभून दिसतो. ऑफिस असो किंवा सणसमारंभ... आरामदायी सलवार कमीझ घालण्यावर महिलांचा भर असतो. पण बॉटम म्हणून प्रत्येक वेळी सलवारच कॅरी करायला हवी असं नाही. तुम्ही विविध प्रकारच्या बॉटम्सनी आपला लूक खुलवू शकता. अशाच काही ट्रेंडी बॉटम्सवर एक नजर टाकू या.

✻ धोती सलवार हा प्रकार सध्या बराच इन आहे. ही सलवार शॉर्ट आणि लाँग कुर्त्यासह अनारकली कुर्त्यासोबतही कॅरी करता येईल. यामुळे तुम्हाला वेगळा लूक मिळेल.

✻ मधल्या काळात सिगारेट पँट हा प्रकार लोकप्रिय ठरला आहे. चुडीदारऐवजी सिगारेट पँट्स ट्राय करा. ए लाईन कुर्त्यासोबतच अनारकलीवरही ही स्टाईल शोभून दिसेल. **(क्रमश:)**

## दिनविशेष

### १८ सप्टेंबर

**२००४ :** साहित्यिक डॉ. भालचंद्र दिनकर फडके यांचे निधन.
**२००७ :** पाकिस्तानच्या अध्यक्षपदी निवडून आल्यावर जनरल परवेझ मुशर्रफ लष्करप्रमुखपदाचा राजीनामा देणार.
**२०१४ :** भारत आणि चीनदरम्यान दिल्लीत शिखर बैठकीदरम्यान चुमारमध्ये चिनी सैनिकांची घुसखोरी.
**२०१७ :** देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने रोहिंग्या मुस्लिमांचं वास्तव्य हानिकारक असल्याचं सर्वोच्च न्यायालयात केंद्राचं प्रतिपादन.

## अजब गजब

# लाबच लांब नद्या

जगातील काही नद्यांची लांबी ऐकून आपण थक्क होतो.

✻ 'नाईल' ही जगातली सर्वात लांब नदी आहे. ही नदी उत्तर-पूर्व आफ्रिकेतून वाहते. नाईलची लांबी जवळपास ६६५० किलोमीटर आहे. ही नदी भूमध्य समुद्राला मिळते. ✻ ॲमेझॉन ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची लांब नदी आहे. ही नदी दक्षिण अमेरिकेतून वाहते. या नदीची लांबी ६४०० किलोमीटर आहे. ॲमेझॉन नदीची लांबी नाईलपेक्षा कमी असली तरी तिच्या पाण्याची घनता जास्त आहे. ✻ 'यांगत्जी' ही नदी चीनमधून वाहते. ती आशिया खंडातली सर्वात मोठी नदी आहे. तिचा लांबीच्या बाबतीत जगात तिसरा क्रमांक लागतो. 'यांगत्जी' नदी ६३०० किलोमीटर लांब आहे. या नदीला चीनमध्ये 'चेन जियांग' असंही म्हटलं जातं. 'मिसीसिपी-मिसौरी' ही जगातली चौथ्या क्रमांकाची नदी असून अमेरिकेतली सर्वात मोठी नदी आहे. या नदीची लांबी ६२७५ किलोमीटर आहे. मिसौरी ही मिसिसिपीची उपनदी आहे. 'येनिस-अंगारा-सेलेंगा' या रशिया आणि मंगोलियातून वाहणाऱ्या तीन नद्या एकमेकींशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे लांबीच्या बाबतीत त्यांचा जगात पाचवा क्रमांक लागतो.

## पंचांग

**शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद शु. ७, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : ज्येष्ठा, योग : प्रीति, सूर्योदय ६.२९, सूर्यास्त ६.३७

## फॉरवर्ड्स

**बस्स इतनी सी बात साहेबानों क़ो ख़ल ग़यी...**

**हमारीं कागज़ क़ी कश्ती तूफानों में कैसें चल ग़यी...!**

## आरोग्यमंत्र

# योग्य व्यायाम कोणता ?

उत्तम पचनक्रिया, नीट चालणारी शरीरप्रणाली, सहज होणा-या हालचाली आणि चांगली रोगप्रतिकारशक्ती ही सगळी चांगल्या तंदुरुस्तीची लक्षणं आहेत. नेहमीची कामं केल्यावरसुद्धा जर आणखी कामं करण्यासाठी उत्साह वाटत असेल तर ते उत्तम प्रकृतीचं लक्षण आहे. अर्थातच वेगवगेळ्या वयोगटासाठी हे मोजमाप वेगळं असतं. वयाच्या १५ ते ३० वयापर्यंत भरपूर शारिरीक मेहनत , खेळ आणि बौद्धिक श्रम न थकता करणारी व्यक्ती ही चांगल्या प्रकृतीची म्हणता येईल. तर वयाच्या ३० ते ६० वर्षांपर्यंत आटोक्यात ठेवलेलं वजन आणि रोजच्या कामातील उत्साह सांभाळून ठेवणारी व्यक्ती तंदुरुस्त समजायला हरकत नाही. वयाच्या



साठीनंतर मनाचं समाधान कायम ठेवून जीवन जगण्याचा उत्साह टिकवणारी व्यक्ती पूर्ण तंदुरुस्त आहे हे निश्चित. आजच्या जीवनपद्धतीमध्ये शरीराला नियमित कष्ट फारसे नसतात. त्यामुळे नियोजनपूर्वक व्यायाम करण्याची गरज आहे. व्यायाम कमीतकमी ६ मिनिटं आणि जास्तीत जास्त ४५ मिनिटं करावा. व्यायाम सलगपणे त्यात मोठा विराम न घेता करावा. व्यायाम झाल्यावर सुमारे दहा मिनिटात ह्रदयाचे ठोके पूर्ववत होतील एवढाच व्यायाम करावा. सुरुवातीचा व्यायाम आपल्या एकूण क्षमतेच्या ६० टक्के एवढाच करावा. शरीराच्या सर्व स्नायूंना व्यायाम होईल अशी रचना असावी. स्नायूंना जास्तीत ताण पडावा असं पाहावं. पोटाचे, पाठीचे, हातांच्या, दंडांच्या स्नायूंचे, कमरेचे आणि श्वासोश्वासाचे असे सर्व प्रकारचे व्यायामप्रकार आपल्या आराखडयात असावेत.

## फॅशन पॅशन

हिरवा रंग म्हणजे समृद्धीचं प्रतीक. हिरव्या रंगात वेगळीच जादू असते. या रंगाच्या विविध छटा खूप छान दिसतात. पण मुलांच्या वॉर्डरॉबमध्ये हिरवा रंग अभावानेच आढळतो. हिरव्या रंगाचा शर्ट शहसा घेतला जात नाही. मुलांचा वॉर्डरॉब निळ्या रंगाच्या शर्टसनी भरलेला असतो. आकाशी, गडद निळा, नेव्ही ब्लू, रॉयल ब्लू अशा रंगांच्या शर्ट, टी शर्टसचा खच पडलेला असतो. हे रंग छान दिसत असले तरी तुम्ही काहीतरी ट्रेंडी ट्राय करायला हवं. हिरव्या रंगाचा शर्ट तुमच्या वॉर्डरॉबमध्ये असायला हवा. या रंगामुळे तुमचं वेगळेपण उठून दिसेल. **(क्रमश:)**

## करिअरवाटा

# माध्यमांमधल्या नव्या संधी...

प्रसिध्दी माध्यमांच्या या बहरत्या काळात आवाज दमदार, उच्चार शुद्ध आणि आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींकडे सजगतेनं पाहण्याची वृत्ती असेल तर या क्षेत्रातील उत्तम कारकिर्द घडू शकते. इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, वेब पत्रकारिता, रेडिओमधील करीअर आदी पर्यायांमधून योग्य क्षेत्रामध्ये शिरकाव करणं शक्य आहे. अँकरिंग, वृत्तनिवेदन,



संशोधन आदी क्षेत्रांमध्ये कारकिर्द घडवणं शक्य आहे. आजकाल ऑन स्पॉट रिपोर्टिंग हा विषयही तरूणाईच्या आकर्षणाचं केंद्र बनत आहे. रेडिओचा वाढता वापर अनेक संधी देऊ करत आहे. इथं 'आर जे' (रेडिओ जॉकी) म्हणून कारकिर्द घडवता येते. सफल आर जे होण्यासाठी घटनांचा अभ्यास करण्याची सवय महत्त्वपूर्ण ठरते. मनोरंजनाबरोबर माहिती देणारा आरजे लोकांच्या पसंतीस उतरतो. त्यादृष्टीने अनेक संस्थांनी यासंबंधीचे छोटे-मोठे अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत. पत्रकार म्हणून काम करण्यासाठी बातम्या शोधणं, त्याच्या मुळापर्यंत जाणं आणि लोकांपर्यंत सत्य पोहोचवणं गरजेचं असतं. यासाठी इच्छुकांच्या अंगी निर्भयता हा गुण असायला हवा. संपादक म्हणून काम करायचं असल्यास आणखी काही कौशल्यं आत्मसात करावी लागतात.

## खेचाखेची

### क्लास

**रिक्षावाला** - बोला साहेब, कुठे जाणार?
**गंपू** - नवी मुंबईला.
**रिक्षावाला** - पण साहेब, कोणत्या क्लासने जायचं ते सांगा.
**गंपू** - आं... रेल्वेतला क्लास माहितीय. पण रिक्षात क्लास?
**रिक्षावाला** - फर्स्ट क्लासमध्ये म्युझिक चालू आणि खड्डे चुकवून रिक्षा चालवणार. सेकंड क्लासमध्ये म्युझिक बंद आणि फक्त खड्ड्यातून रिक्षा चालवणार.
**गंपू** - आणि थर्ड क्लास ?
**रिक्षावाला** - मी मागे बसणार तुम्ही रिक्षा चालवायची...!

## वेगळं काही

सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी तुम्ही मित्रमैत्रिणी भाड्याने घेऊन शकता. जपानमधल्या 'रिअल अपील' या कंपनीने ही सोय उपलब्ध करून दिली आहे. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही मजा करू शकता, भरपूर फोटो काढू शकता आणि हे फोटो सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. या कंपनीतले कर्मचारीच मित्रमैत्रिणी म्हणून जातात. त्यांच्यासोबत दोन तास घालवण्यासाठी आठ हजार येन मोजावे लागतात. या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही कितीही फोटो काढू शकता आणि सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींच्या प्रवासाचा आणि खाण्यापिण्याचा खर्च ग्राहकांनाच करावा लागतो.

## फॅशन पॅशन

# लेहंगा व शर्टची नवी स्टाईल



लेहंगा हा एव्हरग्रीन फॅशन ट्रेंड असला तरी त्यातही वैविध्य आणता येतं. तुम्ही वेगळ्या पद्धतीनेही लेहंगा कॅरी करू शकता. तुमच्याकडे शर्ट असेल तर लेहंग्यासोबत शर्ट कॅरी करता येईल. हा शर्ट लेहंग्यात इन करायचा असतो. समजा तुम्हाला जुना लेहंगा कॅरी करायचा आहे. अशा वेळी हीच कल्पना लढवायची. भारीतला शर्ट आणायचा आणि लेहंग्यासोबत घालायचा. यामुळे अगदी हटके लूक मिळेल. लेहंग्यासोबत शर्ट ही कल्पना थोडी विचित्र वाटत असली तरी हे कॉम्बिनेशन खूप छान दिसतं. तुम्ही मिक्स अँड मॅचही करू शकता. अर्थात वेगवेगळे प्रयोग करायला वाव आहेच. म्हणजे तुम्ही कंबरेला छानसा पट्टा बांधू शकता. कलर ब्लॉकिंग ट्राय करू शकता. शर्टवर एखादं जॅकेट घालून लूक खुलवू शकता. काही सेलेब्जनी तर लेहंग्यावर टी शर्ट घालण्याचा ट्रेंडही आणला आहे. टी शर्ट आवडत नसेल तर शर्टचा ऑप्शन आहेच. थोडं गुगल सर्च करा. तिथे सेलेब्जचे शर्ट आणि लेहंगा लूकमधले फोटो नक्कीच मिळतील. त्यांच्याकडून प्रेरणा घ्या. मग काय, आगामी सणांना हा लूक ट्राय करणार ना?

## सुडोकू १५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ४ | ८ | | २ | ६ |
| १ | | ६ | | | | | | |
| | | ५ | | ६ | ७ | ४ | | ९ |
| ३ | | ४ | | | | २ | | ८ |
| | | | ४ | | ९ | | | |
| ९ | | ८ | | | | ६ | | ४ |
| ५ | | १ | ६ | ९ | | ७ | | |
| | | | | | | ८ | | १ |
| ४ | ६ | | ८ | २ | | | ५ | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ८ | १ | ९ | ५ | ६ | ३ | ७ |
| ५ | ३ | १ | ७ | ६ | ८ | २ | ४ | ९ |
| ६ | ९ | ७ | २ | ३ | ४ | ५ | ८ | १ |
| ७ | १ | ३ | ६ | ५ | २ | ८ | ९ | ४ |
| ८ | ६ | ९ | ३ | ४ | १ | ७ | २ | ५ |
| ४ | २ | ५ | ८ | ७ | ९ | १ | ६ | ३ |
| ३ | ७ | २ | ४ | १ | ६ | ९ | ५ | ८ |
| १ | ५ | ६ | ९ | ८ | ३ | ४ | ७ | २ |
| ९ | ८ | ४ | ५ | २ | ७ | ३ | १ | ६ |

# शब्दकोडे क्रमांक १५०



**आडवे शब्द :-**
१) मत देणारा
४) बाजारबुणगे
८) मदत
९) सततचे नामस्मरण
१०) लाल डोळ्याचा शुभ्र पांढरा प्राणी
११) वृद्धत्वाने पीडलेला
१२) बढाया मारणारा
१३) मालक
१४) लाकडी जिना
१६) मेहनत, त्रास, कष्ट
१८) होडी
१९) रेशमी कापडाचा एक प्रकार
२१) धुळीचा कण
२२) देश
२४) लक्ष्मी
२६) दुर्गंधी येऊ लागलेला
२८) मृताची क्रिया
३०) जेव्हा
३२) रोकड
३३) विहिरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
३६) इंद्र
३८) दडविणे
४१) ✻✻✻ पालन, संगोपन
४२) रक्षण करणारा
४४) किंमत, प्रत्येक
४५) कहाणी
४७) जमीन सिमेंटने गुळगुळीत करणे
४८) वल्लरी
५०) महिना
५२) आजूबाजूस
५४) पुष्कळ
५५) मुलगी
५७) सबब, निमित्त
५९) सासरच्या विरुद्ध
६२ ) वाचणारा
६४) औषध
६६) आश्रय, टेका
६७) फूल, पुष्प
६८) रेशमी धोतर
६९) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
७१) परका, अपरिचित
७३) त्वचेचे सालपट (बो भा)
७४) पुरुष
७५) नेहमी, सदोदित
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) मुख, तोंड
७९) एक पक्षी
८०) उत्सव

**उभे शब्द :-**
१) टप्पे घेत घेत केलेला प्रवास
२) बारा वर्षाचा काळ
३) अतिशयोक्ती करणे (म्ह.)
४) वाळवी
५) त्या प्रमाणे
६) रात्र
७) राजाची कारकीर्द
८) गुजराथमधील एक धरण
१२) भांडण, चर्चा
१३) नवरा
१५) चांदी
१७) जागविणारा आवाज
१८) आवाज, छंद
२०) एक अधिक एक चतुर्थांश
२३) धोबी
२५) आई (ग्रा)
२७) लक्ष, एक आंकडा
२९) मोठा भूभाग
३१) वणवा
३४) आकाशातून पडणारे हिमकण (अ. व.)
३५) कमीतकमी
३७) द्वेष
३९) अधिकाराचे स्थान, गीत
४०) दुधाचे दही बनविणारा पदार्थ
४३) माफी मागणारा
४५) शिखराचे टोक
४६) खोटी कारणे
४९) वडील
५१) ठेकेदार
५३) संतोष, आनंद
५६) नूतन
५८) पाठवणी
६०) परराष्ट्राच्या बातम्या गुप्तपणे काढणारा
६१) नक्की, खात्रीने
६३) कदर करणारा
६५) हिंमत, धैर्य
६७) परमेश्वर
७०) मोठी टोपली
७१) कबूतर
७२) बैलाच्या नाकात घालण्याचा दोर
७४) सुसर
७६) सेवक, गुलाम

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता | ज्या | घो | ड्या | व | र | च्या | गो | मा | शा | | क | सा | ब | सा |
| ब | | डा | | सा | ज | | मा | न | व | ता | | व | | सु |
| ड | फ | | सा | | क | वि | ता | | क | र | व | ली | | र |
| तो | र | णा | ग | ड | | षा | | मु | | का | न | | पा | वा |
| ब | क | | वा | र | क | री | | का | म | ना | | मा | न | स |
| | | स | न | | थे | | वा | द | | थ | ड | गे | | |
| खा | र | ट | | छा | क | टा | | म | स | | रा | | ब | |
| न | द | | त | या | री | | मो | | म | ना | व | र | घे | णे |
| सा | | हो | | चि | | भा | र | ती | य | | ड | म | | |
| मा | मा | | चि | त्र | प | ट | | र | | हि | रा | | भा | क |
| | रा | घ | व | | र | | शं | क | र | | व | य | स्क | र |
| उ | मा | | चि | त्र | का | र | | मा | स | ला | | श | र | म |
| प | र | ता | वा | | | वि | मा | न | | ज | र | दा | | णू |
| स्थि | | | ट | क | | वा | | | शि | रा | | य | म | क |
| त | ला | क | | स | ट | र | फ | ट | र | | शि | क | स्त | |

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● शेतकरी कामगार पक्षाचे राज्य कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराया.



● माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवाशी तथा माजी सरपंच नरेंद्र अंबाजी गायकवाड यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय.(छायाचित्र : सलीम शेख)



● श्री. सुहास अनंत पाटील, मु. बेलकडे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली बाप्पाची मनमोहक मुर्ती.



● नाटककार धनेश्वर यशवंत म्हात्रे यांच्या म्हात्रे कुटुंबियाच्यावतीने खोपटे म्हात्रेपाडा येथील निवासस्थानात प्रतिष्ठापना करण्यात आलेली गणरायाची मुर्ती. (छायाचित्र : डी. वाय. म्हात्रे)



● दै. कृषीवलचे पत्रकार दत्तात्रेय अनंत म्हात्रे यांच्या चिरनेर कातळपाडा येथील निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा (छायाचित्र : प्रज्ञेश पवार)



● नांदगाव ग्रामपंचायत सरपंच सौ. सेजल सुदेश घुमकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची आकर्षक मंगलमुर्ती. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)




● ओंकार कर्णेकर मु. रोहा-खारगाव यांच्या घरातील गणेशाची आकर्षकमूर्ती व सजावट.



● चौल घरत आळी येथील विकास महादेव घरत यांच्या घरातील गणरायाचे मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● विक्रांत सुनील म्हात्रे, मु. मानी फाटा, थळ-अलिबाग यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट.



● मयुरेश पाटील, नेहुली यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व सजावट.




● सचिन पाटील यांच्या घरातील गणेशाची आकर्षकमूर्ती



● विजय आमले यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (शे.का.प. पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगाव



● शिवनाथ नारायण कारखेले, भिसेगाव, क्रांतीनगर कर्जत यांच्याघरी बसलेले गणपती बाप्पा. (छायाचित्र : अनिल गवळे)




● मिलींद परशुराम घरत, मु. दिवीपारंगी, चिंचोटी-अलिबाग यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची मुर्ती व 'जनजागृती मराठी भाषा टिकवा, मराठी शाळा वाचवा' आकर्षक देखावा



● माणगाव तालुक्यातील बामणोली गावचे रहिवाशी तथा माजी तलाठी वामन पवार यांच्या निवासस्थानी रामायण देखाव्यासह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय (छायाचित्र : सलीम शेख)



● म्हसळा तालुक्यातील खरसई गावचे रहिवाशी तथा शेकाप माजी तालुका चिटणीस परशुराम मांदाडकर यांच्या निवासस्थानी रामायण देखाव्यासह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सिद्धी दाखिणकर, गांगवली)



● ॲड. पराग म्हात्रे यांच्या घरातील गणेशाची आकर्षकमूर्ती.




● गणपत माळी यांच्या घरातील गणेशाची आकर्षकमूर्ती.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)